। धाराशिव । वर्ष २६ वे । अंक ७८ वा । शुक्रवार दिनांक २९ मे, २०२६ । पृष्ठे ६ । किंमत ०१ ₹
RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26
dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## क्राईम न्युज

### धाराशिव पोलिसांची अवैध मद्य विरोधी कारवाई

धाराशिव (प्रतिनिधी)- पोलीस अधीक्षक श्रीमती रितु खोखर यांच्या मार्गदर्शनाखाली काल बुधवार दि.२७.०५.२०२६ रोजी अवैध मद्य विरोधी धाराशिव जिल्हयात पोलीस ठाणे हद्दीत २९ कारवाया करण्यात आल्या. या छाप्यात घटनास्थळावर आढळलेले सुमारे२,३००लिटर गावठी दारु निर्मीतीचे गुळमिश्रीत रासायनिक द्रव,७२३लिटर गावठी दारु, सिंधी ताडी व देशी विदेशी दारुच्या ११८ सिलबंद बाटल्या असे मद्य जप्त करण्यात आले. सदर जप्त मद्य यांची एकत्रीत किंमत अंदाजे २,६४,२४० आहे. यावरुन महाराष्ट्र मद्य मनाई कायद्यांतर्गत संबंधीत पोलीस ठाण्यात २९ गुन्हे खालीलप्रमाणे नोंदवण्यात आले आहेत.

### जामखेड ते भुम प्रवासा दरम्यान पर्स मधील ६ तोळे ३ ग्रॅम वजनाचे दागिण्याची चोरी

भुम (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी माधुरी सुरज हिवरे, वय २८ वर्षे, रा. थिटे वस्ती, खराडी पुणे ता.जि. पुणे ह.मु. वंजारवाडी ता.भुम जि. धाराशिव या दि. ०९.०५.२०२६ रोजी जामखेड ते भुम प्रवासा दरम्यान फिर्यादी यांचे पर्स मधील ६ तोळे ३ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने व चांदीचे दागिने असा एकुण ३,८०,००० किंमतीचा माल अज्ञात व्यक्तीने गर्दीचा फायदा घेवून चोरुन नेला. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-माधुरी हिवरे यांनी दि.२७.०५.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भुम पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### अवैध गांजा विक्रीसाठी जवळ बाळगणाऱ्यावर गुन्हा दाखल

ढोकी (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे: आरोपी नामे- अच्युत प्रभु पवार, वय ४५वर्षे, रा. पारधी पिडी तेर ता. जि. धाराशिव यांनी दि.२७.०५.२०२६ रोजी १३.२५ वा. सु.आपल्या राहत्या घरी गुलाबी लाल रंगाच्या सुमैय्या साडी सेंटर कापडी पिशवीमध्ये काळपट हिरव्या रंगाचा उग्रवास येत असलेला पाने बिया काड्या व ८ लहान प्लास्टीक पुढ्या असे पिश्वीसह १,६०० किलो ग्रॅम वजनाचा गांजा एकुण ८०,००० किंमतीचा विक्री करीता जवळ बाळगलेला ढोकी पो ठा चे पथकास मिळून आला. यावरुन पोलीसांनी गांजा साहित्यासह जप्त करुन नमूद व्यक्तींविरुध्द कलम ८(क), २० (ब) (ळळ) (अ) एन डी पी एस क्ट अन्वये ढोकी पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

### 'तडजोड शुल्क'वसुल

धाराशिव (प्रतिनिधी)- धाराशिव शहर वाहतुक शाखा व संबंधीत पोलीस ठाण्यांनी महत्त्वाच्या रस्त्यांवर दि.२७ में एप्रिल रोजी मोटार वाहन कायदा-नियम भंग प्रकरणी एकुण ३०९ कारवाया करुन २,५८,९५० 'तडजोड शुल्क'वसुल केले आहे. असे सांगण्यात आले.

## धाराशिव येथे जिल्हा कॉंग्रेस कार्यालयात लोकनेते स्व.विलासराव देशमुख यांना अभिवादन




धाराशिव (शीला उंबरे-पेंढरकर)- देशाचे माजी केंद्रीय मंत्री तथा महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री लोकनेते स्व.विलासराव देशमुख यांना जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने जयंतीनिमित्त मंगळवारी (दि.२६) अभिवादन करण्यात आले.

धाराशिव शहरातील काँग्रेस भवन येथे अखिल भारतीय काँग्रेस पार्टीचे नूतन जिल्हाध्यक्ष उमेश राजेनिंबाळकर यांच्या हस्ते स्व.विलासराव देशमुख यांच्या प्रतिमेच पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी स्व.विलासराव देशमुख यांच्या आठवणींना अनेकांनी आपल्या मनोगतात उजाळा दिला. बाभळगाव ग्रामपंचायतचे सरपंच, धाराशिव-लातूर जिल्हा एकत्र असताना धाराशिव जिल्हा परिषदेचे सदस्य ते आमदार, मंत्री, मुख्यमंत्री, केंद्रीय अवजड उद्योग मंत्री असा मोठा राजकीय प्रवास करणारे स्व.विलासराव देशमुख यांनी शेतकरी, शेतमजूर, सर्वसामान्य नागरिकांच्या समस्या सोडविण्याचे काम सातत्याने केले. धाराशिव आणि लातूरच नव्हे तर विकासापासून वंचित असलेल्या मराठवाड्याला न्याय देण्याचा त्यांनी सातत्याने प्रयत्न करून त्यात यहशी मिळविले. त्यामुळेच त्यांची ओळख महाराष्ट्रच नव्हे तर संपूर्ण देशात आहे. कोणतेही काम चुटकीसरशी सोडविणारे, सतत हसतमुख असणारे स्व.विलासराव आपल्यात नाहीत याची खंत अनेकांनी यावेळी व्यक्त करण्यात आली.

अभिवादन कार्यक्रमास काँग्रेसचे जिल्हा संघटक राजेंद्र शेरखाने, नगर परिषदेचे माजी गटनेते खलील सय्यद, अग्निवेश शिंदे, मिलिंद गोवर्धन, सरफराज काझी, धनंजय राऊत, प्रभाकर लोंढे, भारत काटे, वसंत मडके, अंकुश पेठे यांचेसह आजी - माजी पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अपेक्षाविरहित कर्तव्य पार पाडणे हाच आहे खरा कर्मयोग- वैशाली गोस्वामी

धाराशिव (शीला उंबरे-पेंढरकर)- अध्यात्मामध्ये निष्काम कर्म आणि सकारात्मक विचारांचा जागर अतिशय महत्त्वाचा आहे. कर्माला योग्य दिशा देण्यासाठी विवेक आणि नीतिमुल्यांची गरज असते; यातूनच व्यक्तीचे कर्म धर्मात रूपांतरित होते. कोणत्याही फळाची अपेक्षा न ठेवता आपले कर्तव्य प्रामाणिकपणे पार पाडणे हाच खरा कर्मयोग आहे. भगवद्गीतेनुसार, फळाची आस न धरता केलेले कर्मच माणसाला बंधनातून मुक्त करते, असे प्रतिपादन नांदेड येथील प्रसिद्ध भागवतकार वैशालीताई गोस्वामी-कुलकर्णी यांनी केले.

अधिक मासानिमित्त धाराशिव शहरातील समर्थ नगर येथील राम मंदिर येथे १८ मेपासून भागवत सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. या सप्ताहात उपस्थित भाविकांना मार्गदर्शन करताना त्या बोलत होत्या. राम मंदिर ट्रस्ट, समर्थ नगरातील रहिवासी आणि महिला मंडळाच्या उत्स्फूर्त प्रतिसादातून या अध्यात्मिक सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

या सोहळ्यात भगवद्गीतेचे सामूहिक पठण करण्यात आले. यासाठी 'एकादशी ग्रुप'च्या सदस्या मनीषा गोवर्धन, सुनीता दहिटणकर यांच्यासह संजय ठाकरे-पाटील, बंडोपंत प्रयाग आणि भारत मसलेकर प्रामुख्याने उपस्थित होते. कार्यक्रमासाठी वैशाली महाजन, लक्ष्मी मसलैक, वासंती कुलकर्णी, आरती कुलकर्णी यांच्यासह महिला भजनी मंडळाच्या सर्व सदस्यांनी सक्रिय सहभाग नोंदवला. कार्यक्रमाच्या सांगता प्रसंगी वैशाली महाजन आणि विश्वांभर महाजन यांनी भागवतकार वैशालीताईंचा यथोचित सन्मान केला. त्यानंतर महाप्रसादाचे वाटप करून कार्यक्रमाची सांगता झाली.

भागवत सप्ताहानिमित्त मंदिरात दररोज सकाळी नियमित पूजा आणि सकाळी ८ ते ९ या वेळेत प्रभू रामचंद्रजींच्या मूर्तीला अभिषेक केला जात आहे. त्यानंतर महिला मंडळाच्या सदस्या वैशाली महाजन यांच्या हस्ते भागवत ग्रंथाचे मनोभावे पूजन करण्यात आले. सकाळी ९ ते दुपारी १ वाजेपर्यंत अनंत अघोर यांनी पोथीचे संहिता वाचन केले. त्यांच्या सुश्राव्य वाचनाने संपूर्ण मंदिर परिसर दुमदुमून गेला होता. दुपारी ३:३० ते ५:३० या वेळेत भागवतकार वैशालीताई गोस्वामी-कुलकर्णी यांनी कथेचे निरूपण केले. कथेदरम्यान त्यांनी विविध अध्यात्मिक दाखले दिले. याप्रसंगी स्वतःच्या वडिलांचे उदाहरण देत त्यांनी माणसाच्या जीवनात सत्कर्म आणि भगवंत भक्ती किती महत्त्वाची आहे, हे पटवून दिले. भगवंताच्या नामस्मरणात आणि मंत्रोच्चारात असणारी अफाट ताकद त्यांनी उदाहरणांसह स्पष्ट केली, ज्यामुळे उपस्थित सर्व भक्तगण भावूक झाले होते.

## एफसीआय कडून स्वस्त धान्य दुकानांत येणाऱ्या ट्रकमधील धान्याची तपासणी: पारदर्शकतेसाठी नियमित तपासणीची मागणी



कळंब (प्रतिनिधी)- शहरात एफसीआयकडून थेट स्वस्त धान्य दुकानांमध्ये येणाऱ्या ट्रकमधील धान्याची अचानक तपासणी करण्यात आली. पुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांनी धान्याची गुणवत्ता, वजन तसेच संपूर्ण पुरवठा प्रक्रियेची सखोल पाहणी केली. या अचानक झालेल्या तपासणीमुळे शहरातील स्वस्त धान्य दुकानदारांमध्ये खळबळ उडाली आहे.

गोरगरिबांना अत्यल्प दरात धान्य उपलब्ध करून देण्यासाठी राज्य सरकारने अन्न व नागरी पुरवठा योजना सुरू केली आहे. या योजनेअंतर्गत दारिद्र्यरेषेखालील तसेच वंचित घटकांना मोफत किंवा अत्यल्प दरात गहू, तांदूळ, साखर, तेल व डाळींचा पुरवठा केला जातो. अनेक कुटुंबांना एक वेळचे अन्नही मिळत नसल्याने अशा घटकांचा विचार करून ही योजना राबवण्यात येते. राज्याच्या अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागामार्फत ही संपूर्ण योजना कार्यान्वित आहे. यासाठी गावोगावी रास्त धान्य दुकाने सुरू करण्यात आली असून, या दुकानांद्वारे लाभार्थींना नियमित धान्य वितरण केले जाते.

कळंब शहरात एफसीआयकडून थेट स्वस्त धान्य दुकानांमध्ये धान्य पुरवठा केला जात असल्याने धान्य किती प्रमाणात येते, त्याचा दर्जा काय आहे आणि वितरण प्रक्रिया पारदर्शक आहे का, याबाबत नागरिकांमध्ये सातत्याने प्रश्न उपस्थित होत आहेत. धान्याच्या गुणवत्ता व वजनाबाबत तसेच संपूर्ण पुरवठा प्रक्रियेतील पारदर्शकतेसाठी नियमित तपासणी करण्याची मागणी नागरिकांकडून मागील अनेक दिवसांपासून केली जात आहे. या पार्श्वभूमीवर पुरवठा विभागाकडून अचानक तपासणी करण्यात आल्याने यंत्रणेची हालचाल वाढली आहे. संबंधित विभागाने भविष्यातही नियमित पाहणी करावी, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

तपासणीमुळे दुकानदारांमध्ये भीती अन् उडाली खळबळ एफसीआयकडून थेट येणाऱ्या धान्याच्या गुणवत्तेबाबत, वजनातील अचूकतेबाबत तसेच पुरवठा प्रक्रियेतील पारदर्शकतेबाबत नागरिकांकडून सातत्याने प्रश्न उपस्थित केले जात होते. यामुळे नियमित तपासणीची मागणीही जोर धरत होती. या पार्श्वभूमीवर पुरवठा विभागाचे नायब तहसीलदार गोपाळ तापडिया यांनी शहरातील काही स्वस्त धान्य दुकानांना अचानक भेट देऊन तपासणी केली. एफसीआयकडून किती धान्य येते, त्याचा दर्जा काय आहे तसेच वितरण प्रक्रिया नियमाप्रमाणे सुरू आहे का, याची पाहणी करण्यात आली. या कारवाईमुळे दुकानदारांमध्ये चांगलीच खळबळ उडाली आहे.

## मुरूमच्या राहुलने ५३६४ मीटर उंचीच्या एव्हरेस्टवर फडकवला तिरंगा




मुरूम(प्रतिनिधी)- नेपाळमधील अत्यंत खडतर आणि प्रतिकूल हवामानात समुद्रसपाटीपासून तब्बल ५ हजार ३६४ मीटर उंचीवरील 'एव्हरेस्ट बेस कँप' सर करत कोल्हापूरच्या करवीर हायकर्सच्या सात सदस्यीय पथकाने उल्लेखनीय कामगिरी केली. मोहिमेच्या सांगता प्रसंगी मुरूमचे सुपुत्र तथा सध्या रत्नागिरी येथे उपजिल्हा निवडणूक अधिकारी म्हणून कार्यरत असलेले राहुल गायकवाड यांच्या चमूने एव्हरेस्ट बेस कँपवर तिरंगा फडकावत भारतीय संविधानाची उद्देशिका प्रदर्शित करून देशभक्ती आणि सामाजिक बांधिलकीचा संदेश दिला. या मोहिमेत राहुल गायकवाड यांच्यासह जिल्हा माहिती अधिकारी प्रशांत सातपुते, डॉ. सुप्रिया सातपुते, मुरूमचे आप्पासाहेब मुंडासे, कोल्हापूरचे विशाल मेहता तसेच समाजमाध्यम प्रभावक नुपूर आणि अक्षय मठकर सहभागी झाले होते. वयाच्या अवघ्या २१ व्या वर्षी एव्हरेस्ट सर करणाऱ्या गिर्यारोहक कस्तुरी सावेकर यांच्या नेतृत्वाखाली ही मोहीम पार पडली. दि. १५ मे रोजी पथक काठमांडू येथे दाखल झाले. त्यानंतर लुकला विमानतळावरून छोट्या विमानाने प्रवास करत प्रत्यक्ष ट्रेकला सुरुवात झाली. लुकला, फाकडींग, नामचे बाजार, तेंगबोचे, दिंगबोचे, लोबुचे आणि गोरक्षेप असा टप्प्याटप्प्याने प्रवास करत अखेर पथकाने एव्हरेस्ट बेस कँप गाठले.

उणे १५ अंश सेल्सिअस तापमान, हाडे गोठवणारे वारे, दुर्गम मार्ग आणि ऑक्सिजनची कमतरता अशा अनेक आव्हानांवर मात करत पथकाने ही मोहीम यशस्वी केली. मोहिमेच्या यशस्वीतेसाठी 'पीक १५ ॲडव्हेंचर'चे शेखर तमांग, योगेंद्र तमांग आणि प्रशांत तमांग यांनी मार्गदर्शक म्हणून महत्त्वाची भूमिका बजावली.

प्रतिकूल वातावरणातही जिद्द, धैर्य आणि देशभक्तीचा संगम दिसला एव्हरेस्ट बेस कँप मोहिमेदरम्यान लोबुचे ते बेस कँप हा टप्पा अत्यंत आव्हानात्मक ठरला. उणे तापमान, कमी ऑक्सिजन आणि धोकादायक मार्गामुळे प्रत्येक पाऊल काळजीपूर्वक टाकावे लागत होते. अशा कठीण परिस्थितीतही पथकाने जिद्द आणि धैर्याच्या जोरावर यश मिळवले. मोहिमेच्या शेवटी एव्हरेस्ट बेस कँपवर तिरंगा फडकावत भारतीय संविधानाची उद्देशिका प्रदर्शित करण्यात आली. यामुळे देशभक्तीबरोबरच सामाजिक बांधिलकीचाही संदेश देण्यात आला.

## दत्ताभाऊ कुलकर्णी यांच्या नावाची विधानपरिषदेसाठी जोरदार चर्चा; कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण



**धाराशिव (शेख अंजुम)-** आगामी विधानपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपकडून विविध नावांची चर्चा सुरू असताना धाराशिव, बीड आणि लातूर या तीनही जिल्ह्यांतून भाजपचे ज्येष्ठ नेते दत्ताभाऊ कुलकर्णी यांच्या नावाला मोठा पाठिंबा मिळत असल्याचे चित्र दिसून येत आहे. पक्ष संघटनेत अनेक वर्षांपासून सातत्याने कार्य करत जनसामान्यांशी मजबूत नाळ जोडणारे नेतृत्व म्हणून दत्ताभाऊ कुलकर्णी यांची ओळख निर्माण झाली आहे. ग्रामीण भागातील सामान्य कार्यकर्त्यांपासून ते पक्षाच्या वरिष्ठ पदाधिकाऱ्यांपर्यंत सर्वांशी आत्मीयतेचे संबंध ठेवत त्यांनी पक्ष संघटना अधिक मजबूत करण्यासाठी सातत्याने मेहनत घेतली. विशेषतः गावागावांत जाऊन कार्यकर्त्यांना बळ देणे, युवकांना पक्षाशी जोडणे आणि सामाजिक प्रश्नांवर सक्रिय भूमिका घेणे यामुळे त्यांच्याबद्दल कार्यकर्त्यांमध्ये विशेष आदराची भावना निर्माण झाली आहे.

दत्ताभाऊ कुलकर्णी यांनी केवळ राजकारणापुरते मर्यादित न राहता सामाजिक, शैक्षणिक आणि जनहिताच्या विविध प्रश्नांवर सातत्याने आवाज उठवला आहे. शेतकरी, युवक, विद्यार्थी आणि सर्वसामान्य नागरिकांच्या समस्या शासनापर्यंत पोहोचवून त्या मार्गी लावण्यासाठी त्यांनी अनेकदा पुढाकार घेतला. त्यामुळे जनतेमध्ये अभ्यासू, संयमी आणि विकासाभिमुख नेतृत्व अशी त्यांची प्रतिमा तयार झाली आहे. धाराशिव, बीड आणि लातूर जिल्ह्यातील भाजप कार्यकर्त्यांकडून दत्ताभाऊ कुलकर्णी यांना विधानपरिषदेसाठी संधी द्यावी, अशी जोरदार मागणी होत असून त्यांच्या नावामुळे पक्षाला नवचैतन्य मिळेल, अशी भावना व्यक्त होत आहे. विशेष म्हणजे तरुण कार्यकर्त्यांमध्ये त्यांच्या नेतृत्वाबद्दल मोठा उत्साह पाहायला मिळत आहे. राज्यातील बदलत्या राजकीय समीकरणांच्या पार्श्वभूमीवर पक्ष संघटना मजबूत करणाऱ्या आणि तळागाळात प्रभावी संपर्क असलेल्या नेतृत्वाला संधी देण्याची चर्चा सुरू असताना दत्ताभाऊ कुलकर्णी यांचे नाव अधिक चर्चेत आले आहे. आगामी काळात पक्षश्रेष्ठी कोणता निर्णय घेतात याकडे आता संपूर्ण मराठवाड्याचे लक्ष लागले आहे.

## अवैध गुटखा विक्रीसाठी जवळ बाळगणाऱ्यावर गुन्हा दाखल

मुरुम (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत पांलिसाकडून समजलेली माहिती अशी की, अमोल वय ३२ वर्षे, रा. आलुर ता. उमरगा जि. धाराशिव यांनी दि.२७.०५.२०२६ रोजी १७.२५ वा. सु.आलुर येथील एनएच ५४८ बी रोडचे बाजूला असलेल्या हिंदवी हॉटेल समोरील पानस्टॉल येथे महाराष्ट्रात शासनाचे प्रतिबंधीत केलेला गुटखा व तत्सव पदार्थ एकुण ६,५८७ किंमतीचा माल विक्री करीता जवळ बाळगलेला मुरुम पो ठा चे पथकास मिळून आला. यावरुन पोलीसांनी गुटखा साहित्यासह जप्त करुन नमूद व्यक्तींविरुध्द भा.न्या.सं. कलम-२२३, २७४, २७५ सह कलम २६(२)(ळ)(ळळ) अन्न सुरक्षा मानके अधिनियम अन्वये मुरुम पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

तसेच विधी संघर्ष बालक, रा. येणेगुर ता. उमरगा जि. धाराशिव यांनी दि.२७.०५.२०२६ रोजी १७.२५ वा. सु.आष्टा मोड येथे एनएच ६५ रोडलगत महाराष्ट्रात शासनाचे प्रतिबंधीत केलेला गुटखा व तत्सव पदार्थ एकुण १२,१८९ किंमतीचा माल विक्री करीता जवळ बाळगलेला मुरुम पो ठा चे पथकास मिळून आला. यावरुन पोलीसांनी गुटखा साहित्यासह जप्त करुन नमूद व्यक्तींविरुध्द भा.न्या.सं. कलम-२२३, २७४, २७५ सह कलम २६(२)(ळ)(ळळ) अन्न सुरक्षा मानके अधिनियम अन्वये मुरुम पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे. या दोन्ही प्रकरणी पोलिस अधिक तपासा करीत आहेत.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## युद्धामुळे विपरीत घडत आहे

अमेरिका-ईस्त्राईल मिळून इराणवर हल्ला करीत आहेत. तरी इराण हिंमतीने अमेरिकेला हात दाखवत आहे. एक छोटे राष्ट्र असून अमेरिकेला शह देत आहे. वास्तविक जागतिक स्तरावर अनेक ईस्लाम राष्ट्र आहेत. दहशदवाद पोसणारे आहेत मात्र ते गप्प आहेत. अमेरिकेच्या विरोधात बोलत नाहीत. हिंमत दाखवित नाहीत. दहशदवाद कारवायात पुढे असणारे सुद्धा बिळात लपून असल्याचे दिसून येतात. त्यांच्यात अन्यायाविरोधात लढण्याचे सामार्थ्य नाही. एकटा इराण दोन देशाबरोबर लढत आहे. इराणमधील अनेक भाग उद्धस्थ झाले आहेत. लहान मुले व वृद्धांचे मोठे हाल होत असून इतर अनेक इस्लामराष्ट्र अजून ते गप्प आहेत. मुळात युद्धामुळे काय होत आहे. विध्वंस होत आहे. आज इराणची स्थिती भयाण आहे. तरी तो अमेरिकेला शरण येत नाही. त्याच्या हिंमतीची कदर केली पाहिजे. मुळात जो अमेरिका दंडेलशाहीने वागत आहे ते योग्य नाही. आज पर्यंत त्याने छोट्या राष्ट्रांना आर्थिक मदत करावयाची व आपला स्वार्थ साधणे हा हेतू आहे. इराणच्या आजूबाजूला असलेल्या लहान राष्ट्राला त्यांने आपल्या बाजूशी करून घेतले आहे. पाकिस्ताने विशेष करून इराणाला मदत करणे अपेक्षित होते. लादेला पाकिस्तानात घुसून ठार मारले. अमेरिका इस्लाम विरोधी आहे हे अनेक बाबीवरून लक्षात येत असताना पाकिस्तान हा अमेरिकेला साथ देत आला आहे. त्यामुळे आज इस्लाम राष्ट्र गप्प आहे. जगातील सर्व इस्लाम राष्ट्र एक झाल्यास अमेरिकेला बिनशर्त युद्ध समाप्ती करावी लागते मात्र तसे होत नाही. त्यामुळे इराणावर हल्ले केले जात आहेत. याचा परिणाम जगावर होत असून इंधनाच्या तुटवड्यामुळे जगात महागाई वाढली आहे. रशिया भारताचा मित्र आहे. त्याच्याकडून तेल खरेदी करू नये असा दम दिला आहे. भारताने अनेकदा अमेरिकेची दादागिरी झुगारली आहे. त्यामुळे भारताला घाबरत आहे. भारताला हात दाखवायाचा झाला तर पाकिस्ताने लाड पुरवावे लागतील असा मनसुबा मनी ठेवून चालत आहे. आज इराणच्या आवतीभवती सर्व राष्ट्र अमेरिकेचे मांडलीकत्व पत्कारले आहेत. कब्जात आहेत. तसे श्रीलंका, पाकिस्ताला अमेरिका मदत करीत आला आहे. तो मदत करतो याचा अर्थ मोठ्या मनांनी मदत करीत नाही तर भारताला आगामी काळात त्रास देण्यासाठी अमेरिकेने वाईट हेतूने उचललेले पावुल आहे. भारत हा धुर्तपना समजला आहे त्यानुसार वाटचाल करीत आला आहे. अमेरिका हा सतत जगावर आपले वर्चस्व राहावे यासाठी प्रयत्न करीत आहे. ट्रम्पचे धोरण जागतिक शांतात निर्माण करणे हा नाही हे लक्षात घेतले पाहिजे कारण त्यांने अनेकदा लहान राष्ट्राला गिळंकृत करण्याचा प्रयत्न केला आहे. इराणने तोडीस तोड उत्तर दिल्याने व जागतिक स्तरावरील काहीची नाराजी निर्माण झाल्याने शाब्दीक चाल खेळत आहे. अमेरिकेला माहिती आहे की, होर्मुझच्या सामुद्रधुनी चालू ठेवला तर इंधन पुरवठा सुरळीत चालू राहू शकेल. इंधन सर्वांना मिळाले तर त्यातुन उत्पन्न इराणला मिळू शकेल. तो आर्थिकदृष्ट्या सक्षम होवून लढेल. याची भिती आहे. अमेरिकेला तसे पाहिले तर युरेनियमची आवश्यकता आहे. त्यावर ताबा घ्यायचा आहे. वास्तविक दोघात युद्ध चालू असले तरी याचा परिणाम जगाला भोगावा लागत आहे. अनेक राष्ट्राने लॉकडावुन केले आहे. घरीच बसून काम करण्याच्या सुचना दिल्या आहेत. इंधन बचती बाबत कडक धोरण स्विकारले आहे. भारतात अजून कडक धोरणाची अमलबजावणी होताना दिसून येत नाही. इंधनाच्या वाढीव दरामुळे व काही प्रमाणात तुटवड्यामुळे संकट आले असले तरी मोठ्या प्रमाणात नाही. त्यामुळे उद्रेक असे काही नाही. युद्धाचा परिणाम हा जागतिक स्तरावर झालेला आहे. जगात याचे परिणाम उमटले आहेत. यावर मात करावयाची झाली तर युद्ध थांबले पाहिजे. दुसरे काटकसरीने जीवन जगले पाहिजे. इंधनाची काटकसर बरोबर बचत ही आवश्यक आहे. महागाई वाढण्याचे कारण म्हणजे इंधनाचा तुटवडा व दुसरे वाढलेले दर आहेत. मुळात हा विषय जागतिक स्तराचा आहे. एका दोन राष्ट्राची समस्या नाही. जागतिक स्तरावर याची चर्चा अपेक्षित आहे. जगाने एक अमेरिकेच्या विरोधात दबाब गट निर्माण केला पाहिजे. हे काम एकादुसऱ्या राष्ट्राचे नाही तर युनो म्हणा किंवा अन्य मोठ्या संघटनशक्तीने या बाबत ठोस निर्णय घेतला पाहिजे. चीन किंवा रशिया घेवू शकते मात्र त्यांचे संकुचित विचार आहेत. ते आपल्याला काय करायाचे या धोरणात आडकले असल्याचे दिसून येतात. अमेरिका भारताला धरून आहे तसे चीन सोबत आहे. रशियाच्या नादाला जात नाही. जो पर्यंत ट्रम्प अमेरिकेच्या सत्तेस्थानी राहातील तो पर्यंत जागतिक शांतात नांदणार नाही. जागतिक शांततेसाठी ट्रम्प हाटणे आवश्यक आहे. ते पुर्ण काळ सत्ता भोगूनच बाजूला होतील. आज जे जगात चालले आहे हे अमेरिकेन जनतेला आवडत नाही. ट्रम्प यांच्या कार्यक्रमाच्यावेळी गोळीबार होणे हे योग्य लक्षण नाही. ट्रम्प आजही अमेरिकेत सुरक्षित आहेत असे नाही. ते स्वत:ला सुरक्षित समजत नाहीत. तशी परिस्थिती निर्माण केली आहे. देशात या युद्धामुळे इंधनाचा तुटवडा होत असून किंमती वाढल्या आहे. कच्चे तेल भारतात आणणे मोठे आव्हान आहे. अशा आव्हानाला तोड देवुन काही तेलवाहू जहाज भारतात येत आहेत. आता दुसरा मार्ग शोधला असला तरी तो किती सुरक्षित आहे हे पहिल्यांदा पाहिले पाहिजे. इंधन बेसुमार वापरण्याची सवय लागली आहे. स्वयंपाकाचा गॅस अधिक प्रमाणात वापरला जातो. त्याच प्रमाणे या दोन बाब सतत लक्षात ठेवणे आवश्यक आहे. इंधनाबाबत तुटवडा भासणार आहे. त्यामुळे एक तर पर्याय शोधावा, नसता काटकसारने वापर करावा. त्याच प्रमाणे सध्याला इंधनाला पर्याय दिले जात नाहीत. पर्याय आहेत मात्र ते तातडीने लागू करणे अशक्य आहे. मुळात सौरउर्जा, बायोडिझेल, बॅटरी, ईव्हीचा वापर असे कितीतरी पर्याय आहेत. ते तातडीने वापर करण्यासाठी संशोधनाची गरज आहे. वेळ वाया घालविला आहे. आगामी संकट ओळखून वाटचाल न केल्याचा परिणाम सोसावा लागेल. इतर राष्ट्राने जसे आगामी संकट ओळखुन पर्याय शोधून वापरात आणले तसे भारताने केले नाही. त्यामुळे जनतेनी आता विचारर्पुक वाटचालीची गरज आहे. युद्धामुळे विपरीत घडत आहे. या विपरीत घडणाऱ्या परिस्थितीला तोंड दिल्याशिवाय पर्याय नाही हे लक्षात घेतले पाहिजे.

## रॉयल एनफिल्डने 'बुलेट ६५०' लाँच केली: किंमत ३.६५ लाखांपासून सुरू

रॉयल एनफिल्डने आपले नवीन मॉडेल 'बुलेट ६५०' लॉन्च केले आहे. याची सुरुवातीची किंमत ३.६५ लाख (एक्स-शोरूम) ठेवण्यात आली आहे. किमतीच्या बाबतीत, ही बाईक नुकत्याच आलेल्या क्लासिक ६५० ट्विनच्या सुरुवातीच्या रंगांच्या बरोबरीची आहे, परंतु तिच्या टॉप-स्पेक क्रोम व्हेरिएंटपेक्षा बरीच स्वस्त आहे. यात कॅनन ब्लॅक आणि बॅटलशिप ब्लू असे दोन कलर पर्याय मिळतील.



**क्लासिक ६५० सारखी किंमत, पण लूकमध्ये अनेक बदल केले आहेत**

नवीन बुलेट ६५० ला रॉयल एनफिल्डने आपल्या ६५०लल पॅरलल-ट्विन पोर्टफोलिओमध्ये सातवे मॉडेल म्हणून जोडले आहे. ज्याप्रमाणे बाजारात ३५०लल सेगमेंटमध्ये बुलेट ३५० आणि क्लासिक ३५० अनेक गोष्टी शेअर करतात, अगदी तसेच सूत्र कंपनीने येथेही अवलंबले आहे.

बुलेट ६५० चे बहुतेक मेकॅनिकल पार्ट्स क्लासिक ६५० ट्विनसारखेच आहेत, परंतु तिच्या डिझाइन आणि स्टाइलिंगमध्ये बुलेटची पारंपरिक ओळख कायम ठेवण्यासाठी काही खास बदल केले आहेत.

**क्लासिक लुकसाठी क्रोम हेडलाइट हूड आणि पारंपरिक टेल-लाइट**

बाईकला क्लासिक लुक देण्यासाठी क्रोम हेडलाइट हूड आणि पारंपरिक टेल-लाइट देण्यात आली आहे. याव्यतिरिक्त, बुलेटची ओळख मानले जाणारे हाताने रंगवलेले पिनस्ट्राइप्स (मडगार्ड आणि टाकीवर सोन्याच्या पट्ट्या) आणि इंधन टाकीवर मेटलचा सिग्नेचर बॅज देण्यात आला आहे. क्लासिक ६५० च्या तुलनेत, याचा मागील फेंडर (मागील मडगार्ड) अधिक स्केअर्ड-ऑफ म्हणजेच चौकोनी डिझाइनमध्ये येतो, ज्यामुळे याला जुन्या बुलेटसारखा लुक मिळतो.

**लांबच्या प्रवासासाठी अधिक आरामदायक सिंगल-पीस सीट मिळेल**

बुलेट ६५० मध्ये जो सर्वात मोठा आणि व्यावहारिक बदल करण्यात आला आहे, तो म्हणजे तिची सीट. क्लासिक ६५० मध्ये जिथे काढता येण्याजोगी पिलियन सीट (मागील सीट काढण्याचा पर्याय) मिळते, तिथे बुलेट ६५० मध्ये कंपनीने सिंगल-पीस स्टेप्ड सीट दिली आहे. असे मानले जात आहे की, ही सीट बाईक चालवणाऱ्या आणि मागे बसणाऱ्या (पिलियन) दोघांसाठी लांबच्या प्रवासात क्लासिकच्या तुलनेत अधिक आरामदायक सिद्ध होईल.

याव्यतिरिक्त, बाईकचे इन्स्ट्रुमेंट क्लस्टर डिजी-ॲनालॉगच ठेवण्यात आले आहे, ज्यामध्ये इंधन गेज आणि ओडोमीटरसाठी एक लहान डिजिटल डिस्प्ले मिळतो. बाईकच्या हँडलवर पॉलिश केलेले ल्युमिनियम स्विचगियर देण्यात आले आहेत जे तिचा प्रीमियम लुक वाढवतात.

**६४८CC चे जुने विश्वासाई इंजिन, जे ४७hp ची पॉवर जनरेट करेल**

इंजिनबद्दल बोलायचं झाल्यास, बुलेट ६५० मध्ये कंपनीचं सिद्ध झालेलं ६४८cc पॅरलल-ट्विन, एअर/ऑइल-कूल्ड इंजिन देण्यात आलं आहे. हे इंजिन ४७hp ची कमाल पॉवर आणि ५२छा चा पीक टॉर्क जनरेट करतं. या दमदार इंजिनला ६-स्पीड गिअरबॉक्ससोबत जोडण्यात आलं आहे.

सस्पेन्शनसाठी, बाईकच्या पुढच्या बाजूला १२०mm ट्रॅव्हलसह शोवा टेलिस्कोपिक फोर्क आणि मागील बाजूस ९०mm ट्रॅव्हलसह ट्विन शॉक ब्सॉर्बर देण्यात आले आहेत, जे खराब रस्त्यांवरही उत्तम रायडिंग अनुभव देण्याचा दावा करतात.

**ही कंपनीची सर्वात स्वस्त लाँग-व्हीलबेस ६५०CC बाईक**

३.६५ लाख किमतीसह, ही बाईक क्लासिक ६५० च्या टॉप-एंड क्रोम व्हेरिएंटपेक्षा सुमारे १४,००० स्वस्त आहे. यामुळे, रॉयल एनफिल्डच्या लाँग-व्हीलबेस ६५० प्लॅटफॉर्मवर आधारित हे सर्वात परवडणारे मॉडेल बनले आहे. तुम्हाला सांगू इच्छितो की, याच प्लॅटफॉर्मवर कंपनीची सुपर मीटियर ६५०, शॉटगन ६५० आणि क्लासिक ६५० ट्विन देखील आधारित आहेत.

## इबोला व्हायरसची दहशत; जे .पी. नड्डा यांच्या सर्व राज्यांना महत्वाच्या सूचना

केंद्रीय आरोग्य मंत्री जे. पी. नड्डा यांनी आफ्रिकेतील काही भागांमध्ये वाढत्या इबोला रुग्णसंख्येच्या पार्श्वभूमीवर इबोला रोगावरील तयारीच्या उपाययोजनांचा आढावा घेतला. आजपर्यंत भारतात बुंडीबुग्यो इबोला रोगाचा एकही रुग्ण आढळलेला नाही, अशी माहिती यावेळी जे. पी. नड्डा यांनी दिली. जागतिक आरोग्य संघटनेने इबोला उद्रेकाला आंतरराष्ट्रीय सार्वजनिक आरोग्य आणीबाणी घोषित केले. आफ्रिका CDC ने खंडीय सुरक्षेची सार्वजनिक आरोग्य आणीबाणी घोषित केली आहे. परिणामी केंद्रीय आरोग्य पथक त्या दृष्टीने सतर्क झाले असून विशेष खबरदारी घेताना दिसत आहे.

**संसर्ग प्रतिबंध पद्धतींसंदर्भातील मार्गदर्शक सूचना आणि SOP**

दरम्यान, केंद्रीय आरोग्य मंत्री जे. पी. नड्डा यांनी आरोग्य मंत्रालयाचे सचिव, भारतीय वैद्यकीय संशोधन परिषद आणि राष्ट्रीय रोग नियंत्रण केंद्र यांना रुग्णांचा मागोवा, तपासणी आणि देखरेख यासाठी सर्व आवश्यक व्यवस्था सतत सज्ज ठेवण्याचे निर्देश दिले.

आंतरराष्ट्रीय विमानतळे आणि इतर प्रवेशबिंदूंवर वाढीव तपासणी आणि देखरेख उपाय सुरू करण्यात आले असून, तपासणी, क्वारंटाईन, वैद्यकीय व्यवस्थापन, प्रयोगशाळा चाचण्या आणि संसर्ग प्रतिबंध पद्धतींसंदर्भातील मार्गदर्शक सूचना आणि डजझ राज्ये व केंद्रशासित प्रदेशांना पाठविण्यात आल्या आहेत. केंद्र सरकार इबोलाच्या परिस्थितीवर लक्ष ठेवून असून आंतरराष्ट्रीय संस्थांशी सातत्याने समन्वय साधत आहे.

**आजपर्यंत भारतात बुंडीबुग्यो इबोला रोगाचा एकही रुग्ण आढळलेला नाही**

केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री जगत प्रकाश नड्डा यांनी आफ्रिकेतील काही भागांमध्ये नुकत्याच झालेल्या इबोला उद्रेकाच्या पार्श्वभूमीवर इबोला रोगासंदर्भातील तयारी आणि देखरेख उपाययोजनांचा आज आढावा घेतला. सुरुवातीला केंद्रीय आरोग्य मंत्र्यांनी सांगितले की, आजपर्यंत भारतात बुंडीबुग्यो इबोला रोगाचा एकही रुग्ण आढळलेला नाही. मात्र, जागतिक आरोग्य संघटनेने इबोलाला आंतरराष्ट्रीय सार्वजनिक आरोग्य आणीबाणी आणि आफ्रिका CDC ने खंडीय सुरक्षेची सार्वजनिक आरोग्य आणीबाणी घोषित केल्यानंतर, भारत सरकार आफ्रिकेतील इबोलाच्या परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून आहे आणि सार्वजनिक आरोग्याच्या सुरक्षेसाठी खबरदारीचा उपाय म्हणून देशभरात देखरेख आणि तयारीच्या उपाययोजना सक्रियपणे अधिक कडक केल्या आहेत.

दरम्यान, २४ मे २०२६ रोजी भारताने नागरिकांना काँगो लोकशाही प्रजासत्ताक, युगांडा आणि दक्षिण सुदान येथे अत्यावश्यक नसलेला प्रवास टाळण्याचा प्रवास सल्ला जारी केला होता. त्यापूर्वी, २१ मे २०२६ रोजी केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने इबोला रोगासंदर्भातील सार्वजनिक आरोग्य तयारी आणि प्रतिसादासाठी SOP जारी केली होती, ज्यामध्ये आंतरराष्ट्रीय प्रवाशांनी पाळावयाच्या नियमांचा समावेश होता. तसेच २२ मे २०२६ रोजी रुग्णालयांतील संसर्ग नियंत्रण, विलगीकरण सुविधा तयारी आणि इबोला रुग्णांच्या मृतदेहांचे सुरक्षित व सन्मानपूर्वक व्यवस्थापन यासाठी मार्गदर्शक तत्त्वे जारी करण्यात आली होती.

**इबोला उच्च मृत्यूदर असलेला गंभीर विषाणूजन्य रक्तस्त्रावी ताप**

एकात्मिक रोग देखरेख कार्यक्रम विभाग आणि विमानतळ आरोग्य संस्थांना आंतरराष्ट्रीय प्रवाशांमध्ये अस्पष्ट तापजन्य आजारांबाबत अधिक सतर्कता ठेवण्याचे तसेच संशयित रुग्ण आढळल्यास तात्काळ अहवाल देऊन व्यवस्थापन सुनिश्चित करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. इबोला हा उच्च मृत्यूदर असलेला गंभीर विषाणूजन्य रक्तस्त्रावी ताप आहे. सध्या बुंडीबुग्यो विषाणू प्रकारामुळे होणाऱ्या इबोला रोगासाठी कोणतीही मान्यताप्राप्त लस किंवा विशिष्ट उपचार उपलब्ध नाहीत.

## AI च्या युगात आता माणसांनी कथा सांगायला शिकावे: एनव्हीडियाचे सीईओ हुआंग

आर्टिफिशियल इंटेलिजन्सच्या वेगवान जगात मुलांनी आता कोणता विषय शिकावा जेणेकरून त्यांचे भविष्य सुरक्षित राहील, असा प्रश्न अनेकदा विचारला जातो. पण जगातील सर्वात मोठी एआय चिप कंपनी एनव्हीडियाचे सीईओ जेन्सन हुआंग यांचे मत यापेक्षा पूर्णपणे वेगळे आहे. त्यांचे म्हणणे आहे की, एआयच्या युगात काय शिकायचे यापेक्षा एआयचा वापर करून किती चांगले शिकायचे हे अधिक महत्त्वाचे असेल.




सिंगापूरमधील एका चॅनलला दिलेल्या मुलाखतीत हुआंग म्हणाले की, पालकांनी त्यांच्या मुलांनी कोणता विषय निवडला आहे याबद्दल काळजी करू नये. त्यांच्या मते, ज्या गोष्टी पूर्वी महत्त्वाच्या होत्या, जसे की सर्जनशीलता, कथा सांगण्याची क्षमता, समज आणि मानवी संबंध, त्याच भविष्यातही सर्वात महत्त्वाच्या ठरतील.

हुआंग यांनी जपानी विचार वाबी-साबीचाही उल्लेख केला, ज्यात अपूर्णतेच्या सौंदर्याला महत्त्व दिले जाते. त्यांचा संकेत होता की, एआयच्या परिपूर्ण जगात मानवी भावना, चुका आणि वैयक्तिक शैलीच सर्वात खास बनू शकतात. जेसन हुआंग यांनी नोकऱ्यांना कामांची टोपली म्हटले. त्यांच्या मते, एआय अनेक पुनरावृत्तीची कामे स्वयंचलित करेल, परंतु यामुळे मानवांना अधिक कठीण, सर्जनशील आणि धोरणात्मक कामे करण्यास वेळ मिळेल. त्यांनी असेही म्हटले की, एआय मानवांना आळशी बनवणार नाही. जसे संगणक, इंटरनेट आणि स्मार्टफोन आल्यानंतर लोक कमी व्यस्त झाले नाहीत, उलट अधिक काम करू लागले, तसेच एआय देखील मानवी महत्त्वाकांक्षा वाढवेल.

एआयच्या युगात मुलांसाठी सर्जनशील विचार, एआय साधनांचा स्मार्ट वापर, जिज्ञासा आणि सतत शिकण्याची मानसिकता टिकवून ठेवणे महत्त्वाचे आहे.

पत्रकारिता, कला, कथाकथन कधीही कालबाह्य होणार नाही.

**हुआंग यांनी विशेषतः** पत्रकारिता, कला, डिझाइन आणि कथाकथन यांसारख्या क्षेत्रांचा उल्लेख केला. त्यांचे म्हणणे आहे की, एआय माहिती देऊ शकते, परंतु मानवासारखे संवेदनशील संभाषण, योग्य वेळी योग्य प्रश्न विचारणे आणि लोकांना जोडणारी कथा तयार करणे ही अजूनही मानवी क्षमता आहे. ते म्हणाले की, एक चांगला मुलाखतकार फक्त तयारी करत नाही, तर समोरच्या व्यक्तीला लक्षपूर्वक ऐकतो आणि त्याच क्षणी उत्तम प्रतिसाद देतो. मानवाचा हाच समज निर्माण करण्याचा गुण भविष्यातील सर्वात मोठी ताकद असेल.

## सुट्ट्यांमधील वाढलेला स्क्रीन टाईम आणि वाढते तापमान मुलांच्या डोळ्यांसाठी कसे घातक?

उन्हाळा आला की सुट्ट्या, मैदानी खेळ, कुटुंबासोबतच्या सहली आणि भरपूर मजा यांची चाहूल लागते. मात्र, उन्हाळ्यासोबत अनेक आरोग्य समस्या देखील वाढतात. त्यामध्ये डोळ्यांच्या समस्या विशेष लक्ष वेधून घेतात, कारण त्या दैनंदिन जीवनावर परिणाम करू शकतात. कल्पना करा, आपण कुटुंबासोबत सहलीवर गेला आहात आणि डोळे लाल झाल्यामुळे फोटोसुद्धा काढू शकत नाही!



तज्ज्ञांच्या मते, उन्हाळ्यात डोळ्यांच्या समस्यांचे प्रमाण लक्षणीय वाढते. याचे मुख्य कारण म्हणजे आजची मुले आणि अगदी प्रौढ देखील सुट्ट्यांमध्ये मोबाईल, टॅबलेट, टीव्ही आणि गेमिंग डिव्हाइसवर खूप वेळ घालवत आहेत. याशिवाय वाढते तापमान आणि उष्ण हवामान देखील डोळ्यांच्या आरोग्यावर नकारात्मक परिणाम करत आहे.

याविषयी अधिक माहिती देताना डॉ. सोनल देसाई, डॉ अगरवाल्स आय हॉस्पिटल, कल्याण येथील कॉर्निया आणि ऑक्युलर सरफेस रोग तज्ज्ञ सांगतात की, दरवर्षी उन्हाळ्यात ड्राय आय (डोळे कोरडे पडणे) असलेल्या रुग्णांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढते. यामागील प्रमुख कारणांमध्ये वाढलेला स्क्रीन टाइम, धूळ, एसीचा जास्त वापर आणि उष्णता व शरीरातील पाण्याची कमतरता यांचा समावेश होतो.

**स्क्रीन टाईममुळे होणारे डोळ्यांचे त्रास**

उन्हाळी सुट्ट्यांमध्ये मुलांचा स्क्रीन वापर मोठ्या प्रमाणात वाढतो. यामुळे पुढील समस्या निर्माण होऊ शकतात:

**डिजिटल आय स्ट्रेन**

दीर्घकाळ स्क्रीनकडे पाहिल्यामुळे डोळ्यांवर ताण येतो. स्क्रीन वापरताना मुले कमी वेळा पापण्या लवतात. त्यामुळे:
डोळ्यांत जळजळ
पाणी येणे किंवा कोरडेपणा
डोकेदुखी
धूसर दिसणे
अशा तक्रारी निर्माण होतात.

ड्राय आय (डोळे कोरडे पडणे)
सतत स्क्रीन वापरणे आणि एसीमध्ये राहणे यामुळे डोळ्यांतील अश्रू लवकर आटतात. बाहेरील उष्ण हवामानामुळे ही समस्या आणखी वाढते. त्यामुळे:
डोळे लाल होणे
जळजळ
कोरडेपणा किंवा पाणी येणे
यांसारखी लक्षणे दिसू शकतात.

मायोपिया (दूरचे कमी दिसणे) वाढणे
मैदानी खेळ कमी होणे आणि स्क्रीनवरील जवळच्या वस्तूंवर जास्त लक्ष केंद्रित करणे यामुळे मुलांमध्ये मायोपियाचे प्रमाण वाढत आहे. जर मूल टीव्हीजवळ बसत असेल, दूरचे पाहताना डोळे बारीक करत असेल किंवा शाळेतील फळा स्पष्ट दिसत नसेल, तर नेत्रतपासणी करणे आवश्यक आहे.

झोपेच्या समस्या
मोबाईल आणि टॅबलेटमधून निघणारा निळा प्रकाश, विशेषतः रात्रीच्या वेळी, झोपेच्या नैसर्गिक चक्रावर परिणाम करतो. त्यामुळे झोप व्यवस्थित होत नाही आणि दुसऱ्या दिवशी डोळे थकलेले वाटतात.

**उन्हाळ्यात वाढणाऱ्या इतर डोळ्यांच्या समस्या**

उन्हाळ्यात शरीरातील पाण्याची कमतरता झाल्यामुळे डोळे कोरडे पडतात. धूळ आणि प्रदूषणामुळे डोळ्यांच्या ॲलर्जीचे प्रमाण वाढते. तसेच अस्वच्छ स्विमिंग पूलमध्ये पोहल्यामुळे डोळ्यांना संसर्ग होण्याची शक्यता असते. गरम वारे आणि तीव्र सूर्यप्रकाशामुळेही डोळ्यांत त्रास होऊ शकतो.

**उन्हाळ्यात मुलांच्या डोळ्यांची काळजी कशी घ्यावी?**

१. मैदानी खेळांना प्रोत्साहन द्या
दररोज किमान १-२ तास बाहेर खेळल्याने मायोपियाचा धोका कमी होतो आणि डोळ्यांचे आरोग्य सुधारते.

२. २०-२०-२० नियम पाळा
प्रत्येक २० मिनिटांच्या स्क्रीन वापरानंतर २० फूट दूर असलेल्या वस्तूकडे २० सेकंद पाहावे. यामुळे डोळ्यांवरील ताण कमी होतो.

३. स्क्रीन टाइम मर्यादित ठेवा
मोबाईल गेम्स आणि सतत टीव्ही पाहणे टाळावे. मध्ये-मध्ये ब्रेक घेणे आवश्यक आहे. पालकांनी पॅरेंटल कंट्रोल सेटिंग्सचा वापर करावा.

४. पुरेसे पाणी प्या
शरीरात पाण्याची कमतरता होऊ नये यासाठी मुलांनी पुरेसे पाणी पिणे आवश्यक आहे.

५. सनग्लासेस आणि कॅप वापरा
बाहेर जाताना णत संरक्षण असलेले सनग्लासेस आणि कॅप वापरल्यास सूर्यप्रकाश, धूळ आणि णत किरणांपासून संरक्षण मिळते.

६. डोळ्यांची स्वच्छता राखा
घाणेरड्या हातांनी डोळे चोळू नयेत. बाहेरून आल्यावर स्वच्छ पाण्याने डोळे धुवावेत आणि स्वच्छ स्विमिंग पूलच वापरावेत.

# बिकट स्थितीची कबुली

तीन 'एफ' बरोबर सरकारचे अपयश-फेल्युअर-हा चौथा 'एफ'अर्थ मंत्र्यांनी स्वीकारला पाहिजे. पंतप्रधानांच्या परदेश वाऱ्यांनी निर्यात वाढत नाही. मग परकीय चलन येणार कसे व कोठून? पश्चिम आशियातील युद्धाने भारतीय अर्थ व्यवस्थेवर मोठा ताण निर्माण केला आहे; पण सरकार ते उघडपणे मान्य करण्यास तयार नाही. अलीकडे मुंबईत एका कार्यक्रमात बोलताना अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी देशाची अर्थव्यवस्था मजबूत आणि प्रतिकूलतेस तोंड देण्यास समर्थ असल्याचा दावा केला. सरकारच्या धोरणांवर टीका करणारे भीती पसरवत आहेत, अशी टीकाही त्यांनी केली. त्याच भाषणात त्यांनी अर्थव्यवस्थेपुढील अडचणींचा उल्लेख केला. इंधन (फ्युएल), खते (फर्टिलायझर) व परकीय चलन (फॉरेक्स) हे तीन 'एफ' मोठी आव्हाने आहेत असे त्या म्हणाल्या. त्यांच्या बोलण्यात विसंगती जाणवते. अर्थ क्षेत्रातील तज्ज्ञ याच तीन बाबींवर बोलत आहेत. गेल्या आठवड्यात परकीय चलनाचा साठा ८.०९४ अब्ज डॉलर्सने घसरून ६८८.८९४ अब्ज डॉलर्सवर आला. परकीय चलन वाचवण्याच्या हेतूनेच



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अलीकडे सोने खरेदी करू नये व परदेशी जाऊ नये असे आवाहन देशाच्या जनतेस केले. युद्धामुळे आंतरराष्ट्रीय बाजारात खनिज तेलाच्या व गॅसच्या किमती वाढल्या आहेत. भारत आपल्या इंधनाच्या गरजेच्या सुमारे ८५ टक्के इंधन आयात करतो. त्यामुळे एप्रिलमध्ये खनिज तेल व गॅसच्या आयातीसाठी १६.३ अब्ज डॉलर्स खर्च करावे लागले.



**महागाईचा मार**

सरकारी इंधन वितरण कंपन्यांना तोटा होत असल्याचे कारण देत केंद्र सरकारने पेट्रोल व डिझेलचे दर १५ ते २५ मे या काळात चार वेळा वाढवले. ही एकूण वाढ लीटरमागे ७ रुपयांपेक्षा जास्त आहे. तरीही तेल कंपन्यांना दररोज ६०० कोटी रुपये तोटा होत असल्याचे सरकारचे म्हणणे आहे. याचा अर्थ इंधनांची पुन्हा दरवाढ शक्य आहे. वाहनांच्या 'सीएनजी' मध्ये झालेली दरवाढ वेगळी आहे. सामान्य माणसाचा रोजचा प्रवास त्यामुळे महागला आहे. इंधन महागले की वाहतूक महागते आणि सर्व वस्तूंचे दर वाढतात हे लवकरच अनुभवास येईल. मात्र सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेस लगेचच तिकिटांचे दर वाढवता येत नसल्याने त्यांचा तोटा वाढतो. परिणामी राज्यांची आर्थिक तूट वाढते. जनतेवर कर लादून ती भरून काढली जाते, म्हणजे सामान्यांवर दुहेरी भार पडतो. भारतास खतांचीही मोठी आयात करावी लागते. खतांच्या निर्मितीसाठीही गॅसचा वापर होतो. दोन्ही बाबी महागल्याने खत महागले आहे. खते, खत बनवण्यासाठी लागणारा कच्चा माल व गॅस यांच्या आयातीवर २०२५-२६ या वर्षात सुमारे २७.१६ अब्ज डॉलर्स खर्च झाले. म्हणजे इंधन व खते यांच्यावर परकीय चलनाचा मोठा भाग खर्च होतो. सोन्याच्या आयातीवर २०२५-२६ या वर्षात देशाने तब्बल ७२ अब्ज डॉलर्स खर्च केले. सामान्य भारतीय गरजेपोटी-मुलीचा विवाह वगैरे- सोने खरेदी करतो. गुंतवणुकीसाठी सोने खरेदी करणारे श्रीमंत असतात. सोन्याचे सध्याचे दर पाहता सामान्य माणूस ते खरेदी करू शकत नाही. भारतीयांनी सोने/चांदी यांची खरेदी केली नाही तर किती परकीय चलन वाचेल? त्या वरील आयात शुल्क वाढवल्याने किती फायदा होईल? तीच गोष्ट परदेशी प्रवासाची. परकीय चलनाचा सर्वांत जास्त वापर सरकारच करते हे लक्षात घेता पंतप्रधानांचे आवाहन गैर लागू ठरते. युद्ध सुरू झाल्यापासून परदेशी गुंतवणूकदारांनी सुमारे २४.४ अब्ज डॉलर्स काढून घेतले आहेत. थेट परदेशी गुंतवणूक मंदावली आहे. त्यामुळे परकीय चलनावर ताण आला आहे आणि डॉलरच्या तुलनेत रुपया घसरत आहे. निर्यात वाढत नसल्याने चालू खात्यावरील तूट वाढत आहे. देशाचा विकास दर चालू वर्षी (२०२६-२७) ६.९ टक्के राहील हा रिझर्व बँकेचा अंदाज आहे; पण परदेशी पत मानांकन संस्थांच्या मते तो ६.५ ते ६ टक्के राहील. रोजगार निर्मितीसाठी हा दर पुरेसा नाही. महागाई व बेरोजगारी असा दुहेरी दणका जनतेस बसणार आहे. निर्यातीत भरघोस वाढ झाली तर परकीय चलन देशात येईल; पण सध्याच्या स्थितीत ते अशक्य दिसते.

# सामाजिक माध्यमे, अफवा आणि कळप मानसिकता

अफवा, सामाजिक माध्यमांवरील चर्चा आणि नावातील साधर्म्य यांचा परिणाम किती वेगाने होऊ शकतो, याचे ताजे उदाहरण नुकतेच पाहायला मिळाले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी इटलीच्या पंतप्रधान जॉर्जिया मेलोनी यांना मेलडी चॉकलेट भेट दिल्यानंतर सामाजिक माध्यमांवर मेलडी आणि पार्ले हे शब्द प्रचंड चर्चेत आले.

पार्ले आणि मेलडी प्रकरण

मोदी-मेलोनी भेटीतील मेलडी क्षण सामाजिक माध्यमांवर व्हायरल झाला. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी इटलीच्या दौऱ्यावर असताना त्यांनी तेथील पंतप्रधान जॉर्जिया मेलोनी यांना भारताची प्रसिद्ध 'मेलडी' चॉकलेट भेट दिली. हा व्हिडिओ सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल झाला आणि 'मेलडी' ब्रँडची जोरदार चर्चा सुरू झाली.

'मेलडी' चॉकलेट हे 'पार्ले प्रॉडक्ट्स' या प्रसिद्ध बिस्कीट आणि कन्फेक्शनरी कंपनीद्वारे बनवले जाते, जी शेअर बाजारात सूचिबद्ध नाही. परंतु, उत्साही गुंतवणूकदारांनी शेअर बाजारात 'पार्ले' नाव शोधले आणि त्यांना 'पार्ले इंडस्ट्रीज' ही कंपनी सापडली, ज्यांचा चॉकलेटशी कोणताही संबंध नाही (ती रिअल इस्टेट आणि पेपर व्यवसायात आहे). परिणामी सूक्ष्म भांडवल असलेल्या या कंपनीच्या शेअरला सलग उच्चांकी मर्यादा लागली. ही घटना नवीन नाही. जगभरातील शेअरबाजारात अशा चुकीच्या ओळखीमुळे अनेकदा शेअर्समध्ये अनपेक्षित उसळी आली आहे.

झूम व्हिडिओ विरुद्ध झूम टेक्नॉलॉजीज

कोरोना काळात ऑनलाइन बैठकींसाठी झूम या मंचाचा वापर जगभर झपाट्याने वाढला. याचा फायदा झूम व्हिडिओ कम्युनिकेशन्सला व्हायला हवा होता; पण अनेक गुंतवणूकदारांनी चुकून झूम टेक्नॉलॉजीज या नावाच्या एका बंद पडत आलेल्या चिनी वायरलेस कंपनीचे शेअर्स खरेदी करण्यास सुरुवात केली. या चुकीमुळे 'झूम टेक्नॉलॉजीज'चा शेअर काही दिवसांतच तब्बल १८००% पेक्षा जास्त वाढला. शेवटी अमेरिकेच्या 'डएउ' या नियामक मंडळाला या शेअरचे ट्रेडिंग काही काळासाठी थांबवावे लागले होते. सिग्नल ॲप आणि सिग्नल ॲडव्हान्स २०२१ मध्ये व्हॉट्सॲपने आपल्या प्रायव्हसी पॉलिसीत बदल केल्यावर, जगातील सर्वात श्रीमंत व्यक्ती एलॉन मस्क यांनी ट्विटरवर यूज सिग्नल (सिग्नल ॲप वापरा) असे एक दोन शब्दांचे ट्विट केले. मस्क यांना 'सिग्नल' नावाचे मेसेजिंग ॲप वापरायचे होते, जे पूर्णपणे मोफत आणि एका नॉन-प्रॉफिट संस्थेचे आहे (ते बाजारात सूचिबद्ध नाही). परंतु, गुंतवणूकदारांनी अमेरिकन बाजारात सूचिबद्ध असलेली सिग्नल ॲडव्हान्स ही वैद्यकीय उपकरणे बनवणारी कंपनी शोधली आणि तिचे शेअर्स खरेदी केले. या केवळ दोन शब्दांच्या ट्विटमुळे 'सिग्नल ॲडव्हान्स' या छोट्या कंपनीचा शेअर तब्बल ११,०००% ने वाढला आणि कंपनीचे बाजारमूल्य काही लाखांवरून थेट अब्जावधी डॉलर्सवर पोहोचले होते.

ट्विटर आणि ट्वीटर होम एंटरटेनमेंट

ट्विटर या सामाजिक माध्यम कंपनीची लोकप्रियता वाढत असताना ट्वीटर होम एंटरटेनमेंट नावाच्या छोट्या कंपनीच्या शेअरमध्येही अचानक तेजी आली होती. फक्त नावातील साम्यामुळे गुंतवणूकदार गोंधळले आणि चुकीच्या कंपनीत पैसा गेला. बॉम्बे ऑक्सिजन आणि वैद्यकीय ऑक्सिजनची मागणी २०२१ मध्ये भारतात कोरोनाच्या दुसऱ्या लाटेदरम्यान वैद्यकीय ऑक्सिजनचा प्रचंड तुटवडा निर्माण झाला होता. त्यामुळे ऑक्सिजन बनवणाऱ्या कंपन्यांना मोठी मागणी येईल, अशी चर्चा होती. गुंतवणूकदारांनी नाव पाहून 'बॉम्बे ऑक्सिजन कॉर्पोरेशन'चे शेअर्स खरेदी धडाका लावला. प्रत्यक्षात या कंपनीने आपला ऑक्सिजनचा व्यवसाय केव्हाच बंद केला होता आणि ती केवळ एक 'इन्व्हेस्टमेंट' (वित्तीय) कंपनी म्हणून काम करत होती. कंपनीचा ऑक्सिजनशी दूरदूरपर्यंत संबंध नसतानाही, तिचा शेअर काही दिवसांतच १३०% पेक्षा जास्त वाढून अप्पर सर्किटवर लॉक झाला होता. एलजी इलेक्ट्रॉनिक्स आणि एलजी बालकृष्णन क्षिण कोरियातील



एलजी इलेक्ट्रॉनिक्स भारतात सूचिबद्ध होणार असल्याच्या चर्चांदरम्यान काही गुंतवणूकदारांनी भारतीय शेअर बाजारात 'एलजी बालकृष्णन अँड ब्रदर्स' नावाच्या कंपनीचे शेअर्स खरेदी केले. ही कंपनी घरगुती उपकरणे बनवत नाही, तर ती ऑटोमोबाइल क्षेत्रासाठी साखळ्या आणि इतर सुटे भाग बनवते. अनेक नवख्या गुंतवणूकदारांनी जागतिक 'एलजी' वाचून या भारतीय कंपनीचे शेअर्स खरेदी केले, ज्यामुळे अनेकदा या शेअरमध्ये विनाकारण मोठी तेजी पाहायला मिळाली आहे.

# इंधन दरवाढीमुळे महागाई दर देशात पाच टक्क्यांवर वाढ

इंधन दरवाढ आणि सोन्या-चांदीवरील वाढीव आयात शुल्कामुळे किरकोळ महागाई दर जून महिन्यात पाच टक्क्यांवर पोहोचण्याची शक्यता वर्तवली जात आहे. तसेच, रिझर्व बँक तूर्तास व्याज दराबाबत कोणताही निर्णय घेणार नाही, असे अर्थतज्ज्ञांनी सांगितले.१५ मे पासून इंधनाच्या दरात चार टप्प्यांत वाढ करण्यात आली. त्यामुळे पेट्रोलच्या दरात ७.३८ रुपये प्रति लीटर आणि डिझेलच्या दरात ७.४८ रुपये प्रति लीटरने वाढ झाली आहे. त्यामुळे आगामी काळात महागाईचा भडका उडण्याची दाट शक्यता आहे.

पश्चिम आशियातील संघर्षामुळे उद्भवलेल्या संकटावर मात करण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बचतीचे आणि काटकसरीचे आवाहन केले आहे. यासोबतच, सोने आणि चांदीवरील आयात शुल्क ६ टक्क्यांवरून १५ टक्के केले आहे. पेट्रोल-डिझेलच्या दरात साडेसात रुपयांची झालेली वाढ पाहता ग्राहक किंमत निर्देशांकावर आधारित महागाई दरात ०.७५ टक्क्यांची वाढ अपेक्षित धरली जात आहे. मे महिन्यात महागाई वाढीचा दर ४ ते ४.५ टक्के आणि जूनमध्ये ४.५ ते ५ टक्क्यांदरम्यान राहू शकतो, असे इवाय इंडियाचे मुख्य धोरण सल्लागार डी. के. श्रीवास्तव यांनी सांगितले.

एप्रिल महिन्यात किरकोळ महागाई दर ३.४८ टक्क्यांवर पोहोचला. मार्चमध्ये हा दर ३.४० तर फेब्रुवारीत ३.२१ टक्के होता. एप्रिल महिन्यात ग्रामीण महागाई दर ३.७४ टक्के तर, शहरी भागात हा दर ३.१६ नोंदविला गेला. मार्च महिन्यात हाच दर ग्रामीण भागात ३.६३ टक्के आणि शहरी भागात ३.११ टक्के नोंदवला गेला. मार्च महिन्यात रिझर्व बँकेने २०२६-२७ या वर्षासाठी महागाई दर ४.६ टक्के राहील, असा अंदाज वर्तवला होता.



# नामस्मरण: सुखी जीवन

दैनंदिन जीवनात नामस्मरण (ईश्वर किंवा गुरुच्या नामाचा जप) केल्याने मानसिक शांतता मिळते, ताणतणाव दूर होतो आणि जीवन आनंदी व समाधानी बनते. नामस्मरणाद्वारे सुखी जीवन जगण्यासाठी खालील व्यावहारिक टिप्स उपयुक्त ठरू शकतात:१. नित्य वेळ आणि जागा निश्चित करासकाळ-संध्याकाळ: रोज सकाळी आणि संध्याकाळी अंघोळीनंतर १५ ते २० मिनिटे शांत बसून नामजप करा.पवित्र जागा: घरात एक स्वतंत्र आणि शांत जागा (देवघर) निवडा, जिथे मन एकाग्र होऊ शकेल.२. श्वासावर लक्ष केंद्रित करानामस्मरण करताना प्रत्येक श्वास घेताना आणि सोडताना नामाचा जप (उदा. 'राम', ' नमः शिवाय', किंवा 'श्रीकृष्ण') मनातल्या मनात सुरू ठेवा. यामुळे विचार चक्र थांबून मन शांत होते.३. दैनंदिन कामांमध्ये नामस्मरण (अखंड जप)जेवण बनवताना, ऑफिसला जाताना किंवा प्रवासात असताना मनात अखंड नामस्मरण चालू ठेवल्यास कामातील थकवा जाणवत नाही आणि ऊर्जा सकारात्मक राहते.४. अर्थ समजून घ्या (भाव महत्त्वाचा)फक्त यांत्रिकपणे (मशीनसारखे) नामजप न करता, नामाचा अर्थ आणि त्यातील भाव समजून घेऊन जप करा. यामुळे ईश्वराशी आंतरिक जोडणी अनुभवता येते.५. कृतज्ञता (त्रीरींळींविश) व्यक्त करानामस्मरणासोबतच देवाने दिलेल्या चांगल्या गोष्टींबद्दल दररोज मनापासून कृतज्ञता व्यक्त करा. यामुळे जीवनातील समाधान वाढते.६. सत्संग आणि अध्यात्मिक पुस्तकेनामस्मरणाची गोडी टिकवून ठेवण्यासाठी नियमितपणे संतांची वचने, प्रवचने किंवा अध्यात्मिक पुस्तकांचे वाचन करा.



## १ Doctor Tips — सल्ला डॉक्टरचा



दैनंदिन आहारात कॅल्शियम, लोह यांसारखे घटक महत्त्वाचे असतात. हिमोग्लोबीन व विविध जीवनसत्त्वांची पातळी शरीरात योग्य राखली गेली, तर डॉक्टरांपासून दूर राहता येईल.दैनंदिन आहारात कॅल्शियम, लोह यांसारखे घटक महत्त्वाचे असतात. हिमोग्लोबीन व विविध जीवनसत्त्वांची पातळी शरीरात योग्य राखली गेली, तर डॉक्टरांपासून दूर राहता येईल.तुम्हाला आरोग्य चांगलं ठेवायचं असेल आणि डॉक्टरपासून दूर राहायचं असेल, तर शरीराकडे लक्ष देणं गरजेचं आहे.

## २ Joke — विनोद





काटा -

बंडू - खंडू, काल माझ्या स्वप्नात माझ्या पायाला एक काटा टोचला.

खंडू - आजपासून पायात चप्पल घालून झोपत जा.

## ३ Message — संदेश



Santa: Ye Nya Mobile Kab Liya?

Banta: Liya Nai.. Girlfriend Ka Uthaya Hai

Santa: Kiyun?

Banta: Wo Roz Kehti thi Ke Tum Mera Phon Nhi Uthate...

## ४ Thought — सुविचार




ज्याला नीट खायला प्यायला मिळते, त्याने आपले कर्तव्यही चोख बजावावे. -थॉमस फुलर

**संस्कृत सुभाषित**

**एकोदरसमुद्भूता एकनक्षत्रजातकाः ।**
**न भवान्ति समाः शील यथा बदरिकाष्टकाः ॥**

अर्थ : एकाच बोराच्या झाडावर उत्पन्न झालेले काटे एक दुसऱ्यासारखे नसतात तसेच एका आईच्या पोटी जन्मलेले, एकाच नक्षत्रावर जन्मलेले सर्व लोक समान नसतात.

# मनोरंजक महाशब्दकोड्यांचा समाचार



### आडवे शब्द

१. करमणूक करणारे
४. चाणक्यनीती
१०. आरक्षित
११. मुसळधार पावसाचे नक्षत्र
१२. पक्षीराज
१३. चांदी
१५. टक्कर
१७. केशतेलातील सुगंधी वनस्पती
१८. हार, सर
२१. इतरांहून निराळी
२३. अनेक प्रकारची फळे
२६. फळांचे शेत
२७. भांडण
२८. कमीजबरोबरचे वस्त्र
३०. रेशमाचे जाडसर कापड
३२. स्वच्छ कारभार!
३४. नमन
३५. विशेष
३६. दयाळू
३७. निरर्थक
३९. पळून जाणे
४१. खाजणारा
४२. ओढ्यावरील तात्पुरता पूल
४४. भूतकाळ
४६. अत्तराचा बोळा
४८. अधिक महिना
५१. नृत्य-नाट्यकलेचे दैवत
५४. निराश, अनुत्साही
५५. नेम, व्रत
५७. उत्सवाचे दिवस
५८. पुष्कळ (ग्रा.)
५९. नमुनेदार
६२. ताबा, बळजबरीने अंमल
६३. दुसऱ्याच्या अंमलाखाली असलेला
६४. लहान मूल
६५. भोळा शंकर
६७. हिंमत
६९. किंचित वक्रता
७०. वेतन, ७१. बातमी
७२. चिंतन, ७३. आणि
७४. उद्देश, नेम
७५. हिंदीत पोस्ट ऑफिस

### उभे शब्द

१. सुंदर स्त्री
२. रंगविलेले
३. भयानक, भयंकर
४. दक्ष
५. जळजळीत, उष्ण
६. झकास
७. वाघाची ललकारी
८. मेहनत, श्रम, त्रास
९. बटबटीत, आगखाऊ
१४. त्रागा, राग, संतापणे
१६. एक छोटे चर्मवाद्य
१७. पत्ता, शोध
१९. मराठीत 'सॉरी'!
२०. निकट, आजूबाजूस
२२. गतिमान
२४. दाखविणे
२५. मनातील इच्छा, बेत
२७. वाद्य वाजविणारा
२९. रम्य
३१. सज्जनगडचे संत
३३. सैनिकांची परेड, व्यायाम
३५. आचारी
३७. बकरा, बोकड
३८. प्राण
३९. सैन्याची तुकडी
४०. फायदा
४१. गैरहजेरी, कामावर बुट्टी
४३. तापापूर्वीचे अंग मोडून येणे
४५. लोखंड घासण्याचे हत्यार
४७. वेदना
४९. फोडातील द्रव
५०. हांजी हांजी करणारे वरिष्ठांनी 'बैल गाभणा' म्हटल्यावर '--- महिना' म्हणण्यास मागेपुढे पाहत नाहीत!
५२. पोपट
५३. चकचकीत
५४. प्रसिद्ध शायर- --- खय्याम
५६. शिर्डीचे संत
५९. सन्मानाचे वेतन
६०. गोष्टी लिहिणारा
६१. आवाजांचा गोंधळ
६३. उद्याच्या नंतरचा दिवस
६५. मूळ बांधकाम
६६. आघात, घाव
६८. अंत:करण

### आडवे उत्तर

१.मनोरंजक ४.साम दाम दंड भेद
१०.राखीव ११.हस्त १२.गरुड
१३.रजत १५.धडक १७.माका
१८.माळ २१.आगळीवेगळी
२३.फळ फळावळ २६.मळा
२७.वाद २८.सलवार ३०.टसर
३२.पारदर्शक ३४.नमस्कार
३५.खास ३६.कनवाळू
३७.अर्थहीन ३९.पलायन ४१.खाजरा
४२.साकव ४४.गतकाल
४६.फाया ४८.मालमास ५१.नटराज
५४.उदास ५५.रसा ५७.सणवार
५८.मस ५९.मासलेवाईक ६२.कब्जा ६३.पर-स्वाधीन
६४.बालक ६५.सांब ६७.धमक
६९.बाक ७०.पगार ७१.वार्ता ७२.मनन ७३.व
७४.लक्ष्य ७५.डाकघर

### उभे उत्तर

१.मनोरमा २.रंगीत ३.कराल
४.सावध ५.दाहक ६.मस्त
७.डरकाळी ८.दगदग ९.भडक
१४.जळफळाट १६.डफ
१७.मागमूस
१९.माफ कर २०.जवळपास
२२.वेगवान २४.प्रदर्शन २५.मनोरथ
२७.वादक २९.रमणीय
३१.समर्थ रामदास स्वामी ३३.कवायत
३५.खानसामा
३७.अज ३८.जीव ३९.फलटण
४०.नफा ४१.खाडा ४३.कसकस
४५.कानस ४७.यातना ४९.लस
५०.नववा ५२.रावा ५३.जरकबरक
५४.उमर ५६.साईबाबा ५९.मानधन
६०.लेखक ६१.कलकल ६३.परवा
६५.सांगाडा ६६.प्रहार ६८.मन



# क्रीडा विश्व



## थोडक्यात/ संक्षिप्त

### क्वालिफायर-२ न खेळता अंतिम फेरीत पोहोचणार गुजरात?

चंदीगड–आयपीएल २०२६ चा प्रवास आता अंतिम टप्प्यात पोहोचला आहे. स्पर्धेतील पुढील सामना क्वालिफायर–२ आहे, जो गुजरात टायटन्स आणि राजस्थान रॉयल्स यांच्यात खेळला जाईल. या सामन्याचा विजेता अंतिम फेरीत आपलं स्थान निश्चित करेल. ३१ मे रोजी, तो संघ विजेतेपदासाठी आरसीबीचा सामना करेल. मात्र एक असं समीकरण तयार होत आहे जे राजस्थान रॉयल्सच्या स्वप्नांना धुळीस मिळवू शकते. गुजरात संघ क्वालिफायर–२ न खेळताही अंतिम फेरीत आपलं स्थान निश्चित करु शकतो. खराब हवामानामुळं सामना रद्द होण्याची शक्यता : गुजरात टायटन्स आणि राजस्थान रॉयल्स यांच्यातील हा महत्त्वपूर्ण सामना २९ मे रोजी महाराजा यादवेंद्र सिंग आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियम, मुल्लानपूर, न्यू चंदीगड इथं खेळला जाईल. सामन्याच्या दिवशी न्यू चंदीगडमध्ये पावसाची शक्यता आहे. समोर येत असलेल्या माहितीनुसार, खराब हवामानाचा या सामन्यावर परिणाम होऊ शकतो. हवामान विभागाच्या अंदाजानुसार, २९ मे रोजी मुसळधार पावसाचा अंदाज आहे.सामना रद्द झाला तर अंतिम सामन्यात कोण जाणार : जर पाऊस किंवा खराब हवामानामुळं सामना रद्द झाला.

### ईशान किशनचा भाईचारा! साकिब हुसैनला ६ बुटांच्या जोड्या केल्या गिफ्ट

मुंबई–सनरायजर्स हैदराबादचा वेगवान गोलंदाज साकिब हुसैनने आयपीएल २०२६ मध्ये आपल्या गोलंदाजीने छाप सोडली. पदार्पण सामन्यातच साकिबने चार विकेट घेतले होते. आयपीएलच्या सुरुवातीला सर्व १० सामन्यात साकिबने विकेट घेतल्या. तो आयपीएलच्या इतिहासात असा एकमेव गोलंदाज आहे ज्याने अशी कामगिरी केली. या सीजनमध्ये साकिबने ११ सामन्यात एकूण १५ विकेट घेतल्या. ईशान किशनने साकिबला गिफ्ट केले शूज : भारतीय विकेटकिपर फलंदाज ईशान किशन आयपीएलमध्ये सनरायझर्स हैदराबाद संघाचा भाग आहे. त्याने या सीजनमध्ये शकिब हुसैनला सामन्यांमध्ये घालण्यासाठी सहा जोड्या शूज दिले. बिहारचाच असलेल्या किशनने शकिबला ॲडिडासचे मॲडिपॉवरफ शूज दिले. शकिब सध्या तेच शूज घालून आयपीएल २०२६ मध्ये खेळत आहे. साकिबने क्रिकइंफोशी बोलताना स्वत: सांगितलं की ईशान किशनने मला बूटं गिफ्ट केले. एक वेळ अशी होती की माझ्याकडे बुटं नव्हते.

### वैभव सूर्यवंशीची पहिली प्रतिक्रिया, तीन शब्दांची पोस्ट शेअर करत सूचक इशारा

चंदीगड–राजस्थान रॉयल्सनं एलिमिनेटरच्या सामन्यात सनरायजर्स हैदराबादचा ४७ धावांनी पराभव करत क्वालिफायर–२ मध्ये प्रवेश केला आहे. राजस्थानच्या विजयात वैभव सूर्यवंशी यानं केलेली ९७ धावांची खेळी महत्त्वाची ठरली. वैभव सूर्यवंशीनं २९ धावांमध्ये ९७ धावा केल्या. या खेळीत वैभवनं १२ षटकार आणि ५ चौकार मारले. या कामगिरीबद्दल त्याला प्लेअर ऑफ द मॅच पुरस्कार देण्यात आला आहे. या वादळी आणि ऐतिहासिक खेळीनंतर वैभव सूर्यवंशीनं एक पोस्ट शेअर करत प्रतिक्रिया दिली आहे. सनरायजर्स हैदराबाद विरोधात वैभव सूर्यवंशी आयपीएलमधील वेगवान शतक मारण्याचा विक्रम मोडू शकला नाही. तो विक्रम ख्रिस गेलच्या नावावर आहे. मात्र, एका आयपीएल हंगामात सर्वाधिक षटकार मारण्याचा ख्रिस गेलचा विक्रम वैभव सूर्यवंशीनं मोडला. वैभव सूर्यवंशीनं यंदाच्या आयपीएलमध्ये आतापर्यंत ६५ षटकार मारले आहेत.

# वैभव सूर्यवंशीची तुलना आफ्रिदीशी करणे चुकीचे!

## पाकिस्तानचा दिग्गज क्रिकेट खेळाडू कांही ही बोलतात?

कराची:पाकिस्तानचा माजी खेळाडू मोहम्मद युसूफने युवा फलंदाज वैभव सूर्यवंशीची तुलना शाहिद आफ्रिदीसोबत केली आहे. तो काय म्हणाला ? जाणून घ्या.

आयपीएल २०२६ स्पर्धेत एकच नाव तुफान चर्चेत आहे, ते म्हणजे वैभव सूर्यवंशी. १५ वर्षांच्या फलंदाजाने आंतरराष्ट्रीय स्तर गाजवणाऱ्या गोलंदाजांची चांगलीच धुलाई केली आहे. सनरायझर्स हैदराबादविरुद्ध झालेल्या सामन्यात त्याने एकाच हंगामात सर्वाधिक षटकार खेचण्याचा ख्रिस गेलचा रेकॉर्ड मोडून काढला. यासह वेगवान शतक झळकावण्याची संधी थोडक्यात हुकली. या खेळीनंतर भारतासह इंग्लंड आणि ऑस्ट्रेलियाच्या दिग्गजांनी त्याच्यावर कौतुकाचा वर्षाव केला आहे. या यादीत आता पाकिस्तानचा माजी खेळाडू मोहम्मद युसूफचं देखील नाव जोडलं गेलं आहे. ९७ धावांच्या खेळीनंतर मोहम्मद युसूफने वैभव सूर्यवंशीची तुलना पाकिस्तानचा माजी खेळाडू शाहिद आफ्रिदीसोबत केली आहे. मोहम्मद युसूफने आपल्या एक्स अकाऊंटवर लिहिले की, १५



वर्षांच्या वैभव सूर्यवंशीला पाहून मला युवा शाहिद आफ्रिदीची आठवण येते. तरुण, निडर आणि स्फोटक फलंदाज. हेच भविष्य आहे. मोहम्मद युसूफने वैभव सूर्यवंशीची तुलना शाहिद आफ्रिदीसोबत केल्यानंतर आता वेगवेगळ्या प्रतिक्रिया येऊ लागल्या आहेत. काहींनी हे पूर्णपणे चुकीचं असल्याचं म्हटलं आहे.आयपीएल २०२६ स्पर्धेतील एलिमिनेटरचा सामना सनरायझर्स हैदराबाद आणि राजस्थान रॉयल्स या दोन्ही संघांमध्ये पार पडला. या सामन्यात वैभव सूर्यवंशीचं वादळ पाहायला मिळालं. पहिल्या डावात फलंदाजी करण्यासाठी आलेल्या राजस्थान रॉयल्सकडून वैभव सूर्यवंशीने सर्वाधिक ९७ धावांची खेळी केली. त्याच्याकडे आयपीएल स्पर्धेतील सर्वात वेगवान शतकाचा रेकॉर्ड मोडण्याची संधी होती. हा रेकॉर्ड ख्रिस गेलच्या नावावर आहे. गेलने ३० चेंडूत शतक पूर्ण केलं होतं. तर वैभव सूर्यवंशी २९ चेंडूत शतक पूर्ण करू शकला असता, पण २९ व्या चेंडूवर तो झेलबाद होऊन माघारी परतला. त्यामुळे त्याचा हा रेकॉर्ड थोडक्यात हुकला. हा रेकॉर्ड जरी हुकला असला तरीदेखील त्याने आणखी २ मोठे रेकॉर्ड मोडून काढले आहेत. वैभव सूर्यवंशीने आयपीएल स्पर्धेच्या इतिहासात एकाच हंगामात सर्वाधिक षटकार मारण्याचा रेकॉर्ड मोडून काढला आहे. याआधी हा रेकॉर्ड ख्रिस गेलच्या नावावर होता. त्याने ५९ षटकार खेचले होते. आता वैभवने ६५ षटकार खेचून हा रेकॉर्ड मोडून काढला आहे.

## पीव्ही सिंधू, लक्ष्य सेन आणि सात्विक–चिरागची दमदार आगेकूच

मुंबई २८ मे (पीएसआय)

सिंगापूर ओपन सुपर ७५० बॅडमिंटन स्पर्धेत भारतीय खेळाडूंनी शानदार कामगिरी केली आहे. भारतीय खेळांडूनी चांगली कामगिरी करत उपांत्यपूर्व फेरीत धडक मारली आहे. दोन वेळा ऑलिम्पिक पदक विजेता पीव्ही सिंधू, स्टार शटलर लक्ष्य सेन तसेच पुरुष दुहेरीतील सात्विकसाईराज रंकीरेड्डी आणि चिराग शेट्टी या जोडीने दमदार विजय मिळवत पुढील फेरीत धडक मारली आहे. महिला एकेरीत पीव्ही सिंधूने जपानच्या रिको गुंजीचा अवघ्या दोन गेममध्ये २१–९, २१–१२ असा सहज पराभव केला. सुरुवातीपासूनच सिंधूने सामन्यावर वर्चस्व राखला होता. तीने प्रतिस्पर्धीला कोणतीही संधी दिली नाही. मात्र, उपांत्यपूर्व फेरीत सिंधूसमोर मोठं आव्हान असणार आहे. तिचा सामना आता दक्षिण कोरियाच्या अव्वल मानांकित ॲन से यंगशी होणार आहे. हा सामना सिंधूसाठी महत्त्वाचा ठरणार आहे.

लक्ष्य सेनला नशिबाची साथ

पुरुष एकेरीत भारताचा स्टार खेळाडू लक्ष्य सेनला उपांत्यपूर्व फेरीत पोहोचण्यासाठी फारशी मेहनत घ्यावी लागली नाही. पॅरिस ऑलिम्पिक रौप्यपदक विजेता आणि थायलंडचा खेळाडू कुन्लावुत विटिडसर्न याने सामना सुरू झाल्यानंतर अवघ्या एका मिनिटात दुखापतीमुळे माघार घेतली. त्यामुळे लक्ष्य सेनला वॉकओव्हर मिळाला आणि थेट उपांत्यपूर्व फेरित स्थान मिळाला.आता उपांत्यपूर्व फेरीत लक्ष्य सेनचा सामना जपानच्या कोकी वातानाबेशी होणार आहे. जागतिक क्रमवारीत १९व्या स्थानावर असलेला वातानाबे चांगल्या फॉर्ममध्ये आहे. त्यामुळे हा सामना रंगतदार होण्याची शक्यता आहे. सात्विक–चिरागची संघर्षपूर्ण जीत–भारताची स्टार पुरुष दुहेरी जोडी सात्विकसाईराज रंकीरेड्डी आणि चिराग शेट्टी यांना मात्र पुढील फेरी गाठण्यासाठी कडवी झुंज द्यावी लागली. त्यांनी चायनीज तैपेईच्या ली झी हुई आणि यांग पो सुआन या जोडीचा २१–१५, ११–२१, २१–१८ असा पराभव केला. तीन गेमपर्यंत रंगलेल्या या सामन्यात भारतीय जोडीने निर्णायक क्षणी उत्कृष्ट खेळ करत विजय मिळवला आहे.







## प्रज्ञानानंदाचा ऐतिहासिक विजय ! जगज्जेता कार्लसनला हरवले



मुंबई–भारतीय ग्रँडमास्टर आर प्रज्ञानानंदाने नॉर्वे चेस २०२६ स्पर्धेत जगातील अव्वल बुद्धिबळपटू मॅग्नस कार्लसनला पराभूत करत मोठा उलटफेर घडवून आणला. क्लासिकल फॉरमॅटमध्ये मिळवलेल्या या शानदार विजयामुळे प्रज्ञानानंदाने पुन्हा एकदा जागतिक बुद्धिबळ विश्वाचं लक्ष वेधून घेतलं आहे. या विजयासह तो ४.५ गुणांसह गुणतालिकेत दुसऱ्या स्थानावर आला आहे.विशेष म्हणजे, नॉर्वे चेस स्पर्धेत प्रज्ञानानंदाने कार्लसन क्लासिकल फॉरमॅटमध्ये दुसऱ्या वेळा पराभूत झाला आहे. यापूर्वी २०२४ मध्येही त्याने माजी विश्वविजेत्याला धक्का दिला होता. सामन्यानंतर प्रज्ञानानंद म्हणाला की, सामना अत्यंत बरोबरीचा झाला आणि शेवटच्या क्षणी निकाल कोणाच्याही बाजूने लागू शकत होता.

सात वेळांचा चॅम्पियन कार्लसन तळाला

घरच्या मैदानावर खेळणाऱ्या सात वेळच्या विजेत्या मॅग्नस कार्लसनची मात्र स्पर्धेत निराशाजनक कामगिरी सुरू आहे. सहा खेळाडूंच्या स्पर्धेत तो केवळ १.५ गुणांसह शेवटच्या स्थानावर घसरला आहे. प्रज्ञानानंदाविरुद्धचा पराभव कार्लसनसाठी मोठा धक्का मानला जात आहे.

गुकेशचा सलग दुसरा पराभव

दरम्यान, विद्यमान विश्वविजेता डी गुकेशचा खराब फॉर्म कायम राहिला आहे. फ्रान्सच्या अलीरेझा फिरोजाने त्याला आर्मगेडन टायब्रेकरमध्ये पराभूत करत १.५ गुण मिळवले. जवळपास पाच तास चाललेला क्लासिकल सामना ड्रॉमध्ये सुटला, मात्र आर्मगेडनमध्ये फिरोजाने बाजी मारली. जखमी अवस्थेत खेळत असूनही फिरोजाने सलग विजय मिळवत ७.५ गुणांसह अव्वल स्थान अधिक मजबूत केलं आहे. सामना संपल्यानंतर तो व्हीलचेअर आणि मून बूटमध्ये दिसला. दुसरीकडे गुकेश ३.५ गुणांसह चौथ्या स्थानावर आहे. पुढील फेरीत त्याचा सामना थेट मॅग्नस कार्लसनशी होणार असल्याने चाहत्यांची उत्सुकता वाढली दिव्या देशमुखची विजयी मालिका कायम

महिला गटात भारताच्या दिव्या देशमुखने दमदार कामगिरी कायम ठेवली आहे. तिने स्पर्धेतील आघाडीवर असलेल्या बिबिसारा असाउबायेवाला आर्मगेडनमध्ये पराभूत करत तिसरा टायब्रेकर विजय नोंदवला आहे. या विजयासह दिव्या ४.५ गुणांसह दुसऱ्या स्थानावर पोहोचली आहे. तर अनुभवी भारतीय ग्रँडमास्टर कोनेरू हम्पीला अन्ना मुजिचुककडून पराभव पत्करावा लागला. ती दोन गुणांसह शेवटच्या स्थानावर आहे.

काय असतो आर्मगेडन फॉरमॅट?

बुद्धिबळात आर्मगेडन हा सडन–डेथ टायब्रेकर प्रकार असतो. क्लासिकल सामना ड्रॉ झाल्यास निकाल निश्चित करण्यासाठी हा सामना खेळवला जातो. या फॉरमॅटमध्ये ड्रॉची शक्यता नसते आणि कोणत्याही परिस्थितीत विजेता निश्चित केला जातो.

## यशस्वी जयस्वालने आता राजस्थान रॉयल्स सोडून दिलं पाहिजे, मुंबई इंडियन्सच्या माजी खेळाडूचा सल्ला

मुंबई –आयपीएल २०२६ च्या एलिमिनेटरमध्ये वैभव सूर्यवंशीनं वादळी फलंदाजी केली. २९ बॉलमध्ये वैभव सूर्यवंशीनं ९७ धावांची खेळी केली. वैभवच्या या खेळीची सर्वत्र जोरदार चर्चा आहे. मात्र, राजस्थानचा दुसरा सलामीवीर यशस्वी जयस्वाल देखील चर्चेत आहे. यशस्वी जयस्वाल यानं १५ सामन्यांमध्ये ४२६ धावा केल्या आहेत. मात्र, वैभव सूर्यवंशीच्या आक्रमक फलंदाजीसमोर त्याची कामगिरी झाकोळून जातेय. आर. अश्विन यानं देखील काही दिवसांपूर्वी यशस्वी जयस्वालच्या टीममधील स्थानाला धक्का पोहोचतोय, त्याचं महत्त्व कमी होतंय, असं म्हटलं होतं. मुंबई इंडियन्सचा माजी क्रिकेटपटू अंबाती रायडू यानं यशस्वी जयस्वालला मोठा सल्ला दिला आहे. यशस्वी जयस्वालनं आता टीम बदलली पाहिजे, असं रायडूनं म्हटलं. राजस्थान रॉयल्सकडून वैभव सूर्यवंशी नेहमी अशाच प्रकारे खेळेल, नेहमी अशीच स्थिती निर्माण होईल, असं रायडूनं म्हटलं. यामुळं नव्या चर्चेला सुरुवात होताना पाहायला मिळते. एकेकाळी यशस्वी जयस्वाल राजस्थान रॉयल्सचा पोस्टर बॉय होता. आता वैभव सूर्यवंशीनं ती जागा पटकावली आहे.



अंबाती रायडू काय म्हणाला?

अंबाती रायडू म्हणाला की, आता त्याला (यशस्वी) ला टीम बदलली पाहिजे, कारण तो नेहमी त्या व्यक्तीसोबत (वैभव सूर्यवंशी) अशी फलंदाजी करु शकत नाही आणि दिवसेंदिवस तो बाजूला पडत जाईल. कारण, यशस्वी स्वत: एक स्टार आहे, तो दुसऱ्या टीममध्ये गेला तर स्वत:च्या जीवावर मॅच जिंकवून देईल. आता त्याला स्पेस आणि प्लॅटफॉर्मची गरज आहे, असंही अंबाती रायडूनं म्हटलं.

अंबाती रायडू यानं आयपीएलमध्ये चेन्नई सुपर किंग्ज आणि मुंबई इंडियन्सचं देखील प्रतिनिधीत्व केलं आहे. अंबाती रायडून वैभव सूर्यवंशीचा उल्लेख करत म्हणाला की, हा खेळाडू नेहमीच असंच खेळत राहील आणि त्याच्या सोबत असलेल्या खेळाडूंना बाजूला करत राहील. यामुळं वैभव सूर्यवंशीसोबत एक वरिष्ठ पार्टनर असावा, जो त्याच्या यशानं आनंदी होईल, नाकी त्याच्यासोबत स्पर्धा करेल. यशस्वी जयस्वाल मुंबईचा असल्यानं त्याच्यासाठी मुंबई इंडियन्स चांगली टीम ठरेल, असंही अंबाती रायडूनं म्हटलं.

वैभव सूर्यवंशीनं २०२६ च्या आयपीएलमध्ये १५ डावांमध्ये ४५.३३ च्या सरासरीनं आणि २४२.८६ च्या स्ट्राइक रेटनं ६८० धावा केल्या आहेत. या हंगामात त्यानं ५५ चौकार आणि ६५ षटकार मारले आहेत. तर, यशस्वी जयस्वालनं या हंगामात १५ डावात ३२.७६ च्या सरासरीनं १५३.२३ च्या स्ट्राइक रेटनं ४२६ धावा केल्या आहेत. यामध्ये ५२ चौकार आणि १८ षटकारांचा समावेश आहे. दरम्यान, वैभव सूर्यवंशीनं आयपीएलच्या एलिमिनेटरच्या सामन्यात २९ बॉलमध्ये ९७ धावा केल्या होत्या. या डावात त्यानं १२ षटकार मारले. वैभव सूर्यवंशीनं वीरेंद्र सेहवाग, ख्रिस गेल, शेन वॅटसन या सारख्या दिग्गजांना मागं टाकलं.

# नोव्हाक जोकोविचचा तो ‘जादुईफशॉट! व्हॅलेंटाईन रॉयरविरुद्ध मिळवला थरारक विजय

पॅरिस–टेनिस जगताचा बादशहा आणि २४ ग्रँडस्लॅम जिंकणारा महान खेळाडू नोव्हाक जोकोविचने वय केवळ एक आकडा असल्याचे पुन्हा एकदा जगाला दाखवून दिले आहे. फ्रेंच ओपन २०२६ च्या (रोलाँड गॅरोस) दुसऱ्या फेरीतील एका अत्यंत चुरशीच्या सामन्यात जोकोविचने आपल्या अद्भूत आणि अमानवीय टेनिस कौशल्याची अशी काही झलक दाखवली, ज्याने पॅरिसमधील कोर्ट फिलिप–शॅट्रियरवर उपस्थित हजारो टेनिस चाहत्यांच्या काळजाचा ठोका चुकला. फ्रान्सच्याच नवोदित व्हॅलेंटाईन रॉयरविरुद्ध खेळताना जोकोविचने मारलेला एक मअराउंड–द–नेटफ जाळीच्या बाहेरून मारलेला शॉट सध्या या संपूर्ण स्पर्धेतील आणि क्रीडा जगतातील सर्वात मोठा चर्चेचा विषय ठरला आहे.

सामन्यादरम्यान पॅरिसमध्ये कडक ऊन आणि प्रचंड उकाडा होता. कोर्टवरील तापमान खेळाडूंचा कस पाहत होते. एकीकडे ३९ वर्षांचा प्रचंड अनुभवी जोकोविच होता, तर दुसरीकडे स्थानिक प्रेक्षकांच्या पाठिंब्यावर हवेत तरंगणारा २४ वर्षांचा तरुण फ्रेंच खेळाडू व्हॅलेंटाईन रॉयर होता. या दोन पिढ्यांमधील लढाईत सुरुवातीला जोकोविचचे वर्चस्व दिसत असले, तरी जसजसा सामना पुढे सरकला, तसतसा हा सामना एका ऐतिहासिक महायुद्धासारखा भासू लागला. कठीण परिस्थितीतही दोघांमध्ये प्रत्येक गुणासाठी जोरदार टक्कर सुरू होती.

सामन्याच्या चौथ्या सेटमध्ये तो क्षण आला ज्याने टेनिसचा इतिहास एका वेगळ्या उंचीवर नेला. रॉयरने मारलेला एक उत्कृष्ट क्रॉस–कोर्ट शॉट थेट कोर्टच्या अगदी कोपऱ्यात, डबल्स गल्लीच्या जवळ गेला. चेंडूचा वेग आणि कोन पाहता, तो परतवणे कोणत्याही सामान्य खेळाडूसाठी जवळजवळ अशक्य होते. मात्र, कोर्टच्या दुसऱ्या टोकावरून जोकोविचने चित्तासारखी धाव घेतली. चेंडू जमिनीवर दुसऱ्यांदा टप्पा पडण्यापूर्वीच जोकोविचने स्वत:च्या शरीराचा समतोल सांभाळत रॅकेट चेंडूला टेकवले.

मअराउंड–द–नेटफ शॉटने इतिहास रचला

इथेच जोकोविचच्या महानतेची प्रचिती आली. त्याने तो चेंडू नेहमीप्रमाणे नेटच्या (जाळीच्या) वरून मारण्याचा प्रयत्न केला नाही, कारण तिथे रॉयर आधीच तयार उभा होता. जोकोविचने अत्यंत हुशारीने आणि अचूक कोनाचा वापर करत चेंडू थेट



नेटच्या खांबाच्या बाहेरून एका अप्रतिम वळणावर फिरवला. हा चेंडू खांबाच्या बाजूने वळसा घालून थेट रॉयरच्या कोर्टच्या आत रिकाम्या जागेत पडला आणि जोकोविचला एक मक्लीन विनरफ मिळाला. टेनिसमध्ये असे शॉट्स क्वचितच पाहायला मिळतात.

प्रेक्षक अवाक, रॉयर चक्रावला!

हा शॉट इतका अकल्पनीय आणि थक्क करणारा होता की, प्रतिस्पर्धी खेळाडू व्हॅलेंटाईन रॉयर काही सेकंद फक्त पाहतच राहिला, त्याला स्वत:च्या डोळ्यांवर विश्वास बसत नव्हता. स्टेडियममध्ये उपस्थित असलेल्या फ्रेंच प्रेक्षकांनी, जे रॉयरला पाठिंबा देत होते, त्यांनीही आपल्या डोक्याला हात लावला. संपूर्ण कोर्ट फिलिप–शॅट्रियर एका क्षणासाठी शांत झाले आणि दुसऱ्याच क्षणी जोकोविचच्या नावाने दुमदुमून गेले. टाळ्यांचा कडकडाट थांबण्याचे नाव घेत नव्हता, कारण प्रेक्षकांना माहित होते की त्यांनी टेनिस इतिहासातील एक अजरामर क्षण जिवंत पाहिला आहे.

तरुण रॉयरचे अनपेक्षित आणि कडवे आव्हान

या सामन्यात २४ वर्षीय फ्रेंच खेळाडू व्हॅलेंटाईन रॉयरकडून जोकोविचला इतका मोठा संघर्ष करावा लागेल, अशी सामन्यापूर्वी कोणालाच अपेक्षा नव्हती. जोकोविच हा सामना सरळ सेटमध्ये सहज जिंकेल असा क्रीडा पंडितांचा अंदाज होता. परंतु, रॉयरने घरच्या मैदानावर आणि स्थानिक प्रेक्षकांच्या दिलेल्या अफाट पाठिंब्यामुळे आपल्या कारकिर्दीतील सर्वोत्तम टेनिस खेळले. त्याने जोकोविचला प्रत्येक रॅलीमध्ये पळवून घाम फोडला आणि सामन्यात जिवंतपणा आणला. पहिले दोन सेट ६–३, ६–२ अशा फरकाने गमावल्यानंतरही रॉयरने हार मानली नाही. तिसऱ्या सेटमध्ये त्याने आपल्या खेळाचा स्तर कमालीचा उंचावला. जोकोविचच्या प्रत्येक सर्व्हिसवर त्याने प्रतिआक्रमण केले. हा सेट टायब्रेकरमध्ये गेला, जिथे रॉयरने कमालीचा संयम दाखवत जोकोविचला ७–६ (७) अशा फरकाने धूळ चारली आणि तिसरा सेट आपल्या नावावर करत सामन्यात खळबळ माजवून दिली. यामुळे सामन्यात कमालीचा थरार निर्माण झाला.

अनुभवाच्या बळावर जोकोविचचा ममॅरेथॉनफ विजय

तिसरा सेट गमावल्यानंतर आणि रॉयरचा आक्रमक मूड पाहता जोकोविचवर दडपण आले होते. मात्र, अशाच प्रसंगात जोकोविचची खरी मानसिक ताकद दिसून येते. चौथ्या सेटमध्ये त्याने आपल्या अनुभवाचा अचूक वापर केला. त्याने रॉयरला चुका करण्यास भाग पाडले आणि सामन्यावर पुन्हा एकदा आपली मजबूत पकड मिळवली. अखेर, तब्बल ४ तास चाललेल्या या मॅरेथॉन सामन्यात जोकोविचने ६–३, ६–२, ६–७(७), ६–३ अशा फरकाने विजय मिळवत अत्यंत दिमाखात तिसरी फेरी गाठली. हा सामना संपल्यानंतर दोन्ही खेळाडूंनी एकमेकांना मिठी मारली. तरुण रॉयरसाठी जागतिक क्रमवारीतील अव्वल खेळाडूविरुद्ध आणि अशा दबावाच्या परिस्थितीत खेळण्याचा हा अनुभव खूप काही शिकवून जाणारा ठरला. भविष्यातील एक मोठा तारा म्हणून त्याने स्वत:ची ओळख निर्माण केली. दुसरीकडे, नोव्हाक जोकोविचच्या समृद्ध आणि ऐतिहासिक कारकिर्दीत आणखी एका अविस्मरणीय आणि थरारक विजयाची नोंद झाली आहे. या सामन्याचा निकाल काहीही लागला असला, तरी जोकोविचने मारलेला तो मजादुईफ शॉट फ्रेंच ओपनच्या इतिहासात सुवर्णअक्षरांनी कोरला गेला आहे.

# लातूर शहर जिल्हा काँग्रेसचे नूतन अध्यक्ष प्रा. डॉ. शिवाजी जवळगेकर यांचा पदग्रहण सोहळा उत्साहात पार पडला..

## प्रभाग व बूथ पातळीवर पक्ष संघटना अधिक मजबूत करा–आ. अमित देशमुख यांचे काँग्रेस कार्यकर्त्यांना आवाहन

**लातूर/प्रतिनिधी :** गुरुवार, २८ मे २०२६ काँग्रेस पक्ष संघटनेत कार्यकर्ता घडत असतो आणि दिवसेंदिवस संघटनेला अधिक महत्त्व येत आहे. सर्वांच्या सहकार्याने आपण लातूर शहर महानगरपालिकेत बहुमताने सत्ता स्थापन केली आहे. तर जिल्हा परीषदेला काठावर सत्ता गेली आहे, आता आगामी काळात काँग्रेसची सत्ता आणण्यासाठी कार्यकर्त्यांनी प्रभाग आणि बूथ पातळीपर्यंत संघटना अधिक मजबूत करावी, असे प्रतिपादन माजी मंत्री तथा आमदार अमित विलासराव देशमुख यांनी केले.

राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री तथा महाराष्ट्र विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे मुख्य प्रतोद, आमदार अमित
विलासराव देशमुख यांनी गुरुवार दि. २८ मे रोजी दुपारी लातूर शहरातील काँग्रेस भवन येथे काँग्रेस पक्षाच्या संघटन सृजन अभियानाअंतर्गत लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या अध्यक्षपदी प्रा. डॉ. शिवाजी जवळेकर यांची नव्याने निवड झाली असून लातूर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या अध्यक्षपदी श्री. अभय साळुंके यांची फेरनिवड झालीआहे.

त्यांच्या पदग्रहण सोहळ्यास उपस्थित राहून त्यांचा सत्कार करुन पुढील कार्यासाठी त्यांना शुभेच्छा दिल्या, या प्रसंगी ते बोलत होते.

यावेळी माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख यांनी लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे माजी अध्यक्ष किरण जाधव यांचा सत्कार करून त्यांच्या कामाचे कौतुक करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी खासदार डॉक्टर शिवाजी काळगे, माजी आमदार वैजनाथ शिंदे, लातूर शहर महानगरपालिकेच्या महापौर जयश्री सोनकांबळे, उपमहापौर स्नेहल उटगे, स्थायी समितीचे सभापती सचिन बंडापल्ले, गटनेते विजयकुमार साबदे, माजी महापौर दीपक सूळ, लातूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती जगदीश बावणे, लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे माजी अध्यक्ष किरण जाधव, समद पटेल, विष्णुदास धायगुडे, मोइन सय्यद, विद्याताई पाटील, कैलास कांबळे, प्रवीण कांबळे, व्यंकटेश पुरी, सुपर्ण जगताप, महेश म्हेत्रे, आनंद वैरागे, संजय ओहळ आदिसह काँग्रेसच्या फ्रटल संघटनेचे विविध पदाधिकारी, सर्व तालुकाध्यक्ष नगरसेवक कार्यकर्ते उपस्थित होते.




माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख म्हणाले की, काँग्रेस पक्षासाठी आज आनंदाचा दिवस आहे. पक्षाचा अध्यक्ष म्हणून नूतन निवड झालेल्या अध्यक्षांनी पक्षाला न्याय दिला पाहिजे दिवसेंदिवस संघटनेला अधिक महत्त्व येत आहे, पक्ष संघटनेत कार्यकर्ता घडत असतो. नवनिर्वाचित अध्यक्षांना मदत करण्यासाठी आम्ही सदैव तत्पर राहू, सर्वांच्या सहकार्याने आपण लातूर शहर महानगरपालिकेत सत्तेत आलो तसेच काठावर जिल्हा परिषदेत बहुमता पासून आपण दूर राहिलो, येणाऱ्या काळात लातूर जिल्हा परिषदेत आपली सत्ता येईल, शहरात बूथ पातळीपर्यंत संघटना अधिक मजबूत असली पाहिजे, प्रभाग व बूथ कार्यकारणी लवकरच गठीत केली गेली पाहिजे, केंद्र सरकारच्या अपयशी धोरणाची चर्चा गल्लीबोळात झाली पाहिजे, देशात राज्यात बदलाच वार वाहू लागले आहे असे त्यांनी सांगितले.

पुढे बोलताना ते म्हणाले की, एसआयआर व जनगणना सुरू आहे, या दोन्ही विषयाबाबत काँग्रेस कार्यकर्त्यांनी लक्ष द्यावे, अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, लोकसभा विरोधी पक्षनेते राहुल गांधी, देशाच्या नेत्या प्रियंका गांधींनी एक अभियान राबविले त्या अंतर्गत नूतन जिल्हाध्यक्षांच्या निवडी जाहीर झाल्या आहेत. जिल्हाध्यक्षांना येणाऱ्या काळात अधिक अधिकार देण्यात येणार आहेत, सर्व जाती धर्मांना सोबत घेऊन आपण काम करू असे त्यांनी यावेळी बोलतांना सांगीतले. यावेळी खासदार डॉक्टर शिवाजी काळगे यांनी मार्गदर्शन केले, कार्यक्रमाचे प्रास्ताविक लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे माजी अध्यक्ष किरण जाधव यांनी केले
तर लातूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष अभय साळुंखे, लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष प्राध्यापक डॉक्टर शिवाजी जवळगेकर यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन प्रवीण सूर्यवंशी यांनी केले तर शेवटी आभार प्राध्यापक प्रवीण कांबळे यांनी मानले.

## दुचाकीच्या धडकेत पादचारी वृद्ध जखमी

**लातूर/प्रतिनिधी:** चाकूर–घरणी रस्त्यावर भरधाव दुचाकीने पाठीमागून जोरदार धडक दिल्याने एक वृद्ध पादचारी गंभीर जखमी झाल्याची घटना घडली आहे. नरहरी माणिकराव शिंदे (वय ६०, रा. घरणी) असे जखमी वृद्धाचे नाव आहे. १५ मे रोजी रात्री ८:३० वाजण्याच्या सुमारास शिंदे हे रस्त्याच्या कडेने पायी चालत जात होते. दरम्यान, एम.एच. २४ बी.यु. ६०७९ क्रमांकाच्या दुचाकी चालकाने आपल्या ताब्यातील वाहन अति वेगात व निष्काळजीपणे चालवून शिंदे यांना पाठीमागून जोराची धडक दिली. या भीषण अपघातात शिंदे यांच्या दोन्ही पायांना गंभीर फॅक्चर झाले.

## विलास साखर कारखान्यात दोन दिवसीय प्रशिक्षण शिबिर संपन्न

**लातूर/प्रतिनिधी:** विलास सहकारी साखर कारखाना लि., वैशालीनगर (निवळी), ता. जि. लातूर येथे दरवर्षीप्रमाणे यंदाही लातूर जिल्हा सहकारी बोर्ड आणि लातूर जिल्हा उपनिबंधक (सहकार खाते) यांच्या सहकार्याने कारखान्याचे संचालक मंडळ, अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठीसहकार शिक्षण व प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.




दिनांक २७ मे २०२६ ते २८ मे २०२६ या कालावधीत कारखान्याच्या सभागृहात हे दोन दिवसीय प्रशिक्षण शिबिर उत्साहात पार पडले. या शिबिराच्या अध्यक्षस्थानी कारखान्याचे व्हाईस चेअरमन श्री. वैजनाथराव शिंदे होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यकारी संचालक श्री. आबासाहेब पाटील यांनी केले.

या प्रशिक्षण शिबिरात महाराष्ट्र राज्य सहकारी संघ, पुणेचे माजी मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. ए. एस. शिंदे, लातूर जिल्हा सहकारी बँकेचे जिल्हा सहकारी विकास अधिकारी श्री. एस. एस. देशमुख आणि तज्ञ व्याख्याते श्री. सदाम शेख यांनी उपस्थितांना सहकार कायद्यातील तरतुदींबाबत सखोल मार्गदर्शन केले. प्रशिक्षणादरम्यान संचालक, अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना कामकाजातील समन्वय, वेळेचे प्रभावी नियोजन, उपविधीतील (By-laws) तरतुदी, क्रियाशील सभासद होण्यासाठी आवश्यक पात्रता, सहकारातील कायदे–कानून आणि कर्मचाऱ्यांवरील ताणतणाव व्यवस्थापन या विषयांवर तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. या दोन दिवसीय प्रशिक्षण शिबिरात कारखान्याचे संचालक मंडळ, अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला.

## औसा मतदारसंघात कृषी विज्ञान केंद्र स्थापन करण्याची मागणी आमदार अभिमन्यू पवार यांचे केंद्रीय कृषिमंत्र्यांना निवेदन

**औसा/प्रतिनिधी :** औसा विधानसभा मतदारसंघात स्वतंत्र कृषी विज्ञान केंद्र (KVK) स्थापन करण्यात यावे, अशी मागणी आमदार अभिमन्यू पवार यांनी केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांना निवेदनाद्वारे केली आहे. औसा तालुक्यातील शेतकऱ्यांना आधुनिक शेती तंत्रज्ञान, वैज्ञानिक मार्गदर्शन आणि संशोधन सुविधा स्थानिक पातळीवर उपलब्ध व्हाव्यात, यासाठी आमदार पवार सातत्याने पाठपुरावा करत आहेत.यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार तसेच ज्येष्ठ नेते दिलीपराव वळसे पाटील उपस्थित होते.

याच अनुषंगाने राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनीही केंद्रीय कृषिमंत्र्यांना पत्र देऊन औसा येथे कृषी विज्ञान केंद्र सुरू करण्याबाबत सविस्तर चर्चा केली. या मागणीसाठी राज्य सरकार सकारात्मक असून, औसा परिसरातील शेतकऱ्यांच्या हितासाठी आवश्यक प्रयत्न करण्यात येत असल्याचे यावेळी सांगण्यात आले.औसा तालुका हा दुष्काळग्रस्त आणि शेतीप्रधान भाग म्हणून ओळखला जातो. तसेच औसा विधानसभा मतदारसंघ पूर्णतः भूकंपग्रस्त क्षेत्रात येत असल्याने येथील बहुतांश नागरिकांचे जीवनमान शेतीवर अवलंबून आहे. बदलत्या हवामानाच्या पार्श्वभूमीवर शेतीला आधुनिक




विज्ञान आणि तंत्रज्ञानाची जोड देणे अत्यंत आवश्यक बनले आहे. येथील अनेक शेतकरी आधुनिक आणि वैज्ञानिक शेतीकडे वळत असले तरी आवश्यक तांत्रिक मार्गदर्शन आणि प्रशिक्षण सुविधांचा अभाव जाणवत आहे.

सध्या लातूर जिल्ह्यात केवळ एकच कृषी विज्ञान केंद्र कार्यरत असल्याने औसा परिसरातील शेतकऱ्यांना संशोधन, प्रशिक्षण आणि कृषीविषयक मार्गदर्शनासाठी अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे औसा येथे स्वतंत्र कृषी विज्ञान केंद्र स्थापन झाल्यास शेतकऱ्यांना मृदा व जल व्यवस्थापन, पीक विविधीकरण, फलोत्पादन, आधुनिक शेती तंत्रज्ञान, प्रशिक्षण आणि वैज्ञानिक मार्गदर्शन स्थानिक स्तरावर उपलब्ध होणार आहे. यामुळे शेती उत्पादन वाढीस मदत होऊन शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्यास मोठा हातभार लागणार आहे.

औसा मतदारसंघ आणि लातूर जिल्ह्यासाठी सातत्याने भरघोस निधी उपलब्ध करून देणारे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस हे येथील शेतकऱ्यांच्या पाठीशी सक्षमपणे उभे असल्याचे आमदार अभिमन्यू पवार यांनी सांगितले.

## जिल्हास्तरीय रोजगार मेळावा समन्वयक समितीच्या लातूर जिल्हाध्यक्षपदी लोकरे यांची निवड



**लातूर/प्रतिनिधी:** कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाअंतर्गत आयोजित करावयाच्या रोजगार मेळाव्याच्या समन्वयासाठी राज्यस्तरीय, विभागस्तरीय व जिल्हास्तरीय समन्वयक समिती स्थापन करण्यात येत आहे. यामध्ये जिल्हास्तरीय रोजगार मेळावा समन्वय समितीच्या लातूर जिल्हाध्यक्षपदी सुरज लोकरे यांची निवड करण्यात आली असून भाजपाचे शहर जिल्हाध्यक्ष युवा नेते अजित पाटील कव्हेकर यांच्याहस्ते शाल व पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला.यावेळी अमरदीप वायगावकर, युवा नेते विश्वजीत पाटील कव्हेकर, शिवाजी विद्यालय बिटरगावचे माजी मुख्याध्यापक सूर्यकांत चव्हाण, बाळासाहेब जाधव, अमोल शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते. त्यांच्या या निवडीबद्दल त्यांचे स्वागत करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## राजा नारायणलाल लाहोटी विद्यालयात सावरकर जयंती उत्साहात साजरी

**लातूर/प्रतिनिधी:** येथील राजा नारायण लाल लाहोटी विद्यालयात स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या प्रारंभी रजिस्ट्रार प्रवीण शिवणगीकर यांच्या हस्ते सावरकरांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला.

यावेळी बोलताना प्रवीण शिवणगीकर यांनी स्वातंत्र्यवीर सावरकर हे भारताच्या स्वातंत्र्यलढ्यातील प्रखर क्रांतिकारक, समाजसुधारक, भाषा शुद्धीचे पुरस्कर्ते आणि प्रतिभावंत साहित्यिक होते, अशा शब्दांत त्यांचा गौरव केला.



विद्यालयातील शिक्षक दर्शन देशपांडे यांनी आपल्या मनोगतात सावरकरांचा विज्ञाननिष्ठ दृष्टिकोन, राष्ट्रप्रेम आणि मराठी साहित्यातील योगदान याविषयी माहिती दिली.

कार्यक्रमास पर्यवेक्षक बी. के. भालेराव, आशिष बनसोडे तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.




शाखा १.
जडे–भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

## जनगणनेच्या पहिल्या टप्प्यात लोहारातालुक्यातील ६० टक्के काम पूर्ण:
# जिल्हा समन्वयक प्रकाश यांच्याकडून लोहाऱ्यातील कामकाजाची पाहाणी

**लोहारा/प्रतिनिधी** जनगणनेच्या पहिल्या टप्प्यातील कामकाजाचा आढावा घेण्यासाठी धाराशिवचे जिल्हा जनगणना समन्वयक चेतन प्रकाश यांनी नुकतीच लोहारा तहसील कार्यालयाला भेट दिली. या भेटीदरम्यान त्यांनी सुरू असलेल्या प्राथमिक कामकाजाची प्रत्यक्ष पाहणी करून अधिकाऱ्यांना आवश्यक त्या मार्गदर्शक सूचना केल्या.

देशातील अत्यंत महत्त्वाच्या समजल्या जाणाऱ्या जनगणना २०२७ च्या पहिल्या टप्प्यांतर्गत सध्या विविध स्तरांवर डेटा संकलन, नकाशे अद्ययावत करणे आणि घर गणना करण्याचे काम सुरू आहे. याच कामाची सद्यस्थिती जाणून घेण्यासाठी जिल्हा समन्वयक चेतन प्रकाश यांनी लोहारा येथे विशेष दौरा केला. यावेळी त्यांनी कामकाजाची सविस्तर पाहणी आणि आढावा घेतला. लोहारा तहसील कार्यालयात आयोजित बैठकीत चेतन प्रकाश यांनी तालुक्यातील जनगणनेच्या पहिल्या टप्प्यातील कामांचा सविस्तर आढावा घेतला. यामध्ये प्रामुख्याने नकाशा आणि सीमा निश्चिती, तालुक्यातील गावे, वाड्या आणि प्रभागांच्या सीमा निश्चितीच्या कामाची तपासणी करण्यात आली. जनगणनेचे काम डिजिटल पद्धतीने सुरू असल्याने संगणक यंत्रणेमार्फत होत असलेल्या तांत्रिक तयारीची त्यांनी प्रत्यक्ष पडताळणी केली. जनगणनेच्या कामासाठी लागणारे प्रगणक आणि पर्यवेक्षक यांच्या नियुक्तीबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. याप्रसंगी लोहाराचे चार्ज अधिकारी जनगणना तथा तहसीलदार रणजितसिंह कोळेकर, नायब तहसीलदार, जनगणना विभागाचे संबंधित अधिकारी, महसूल कर्मचारी आणि संगणक विभागाचे कर्मचारी उपस्थित होते. पहिल्या टप्प्याचे काम गतीने आणि समाधानकारक सुरू असल्याबद्दल जिल्हा समन्वयकांनी यंत्रणेचे कौतुक केले. जनगणनेचे काम करणारे सर्व प्रगणक फिल्डवरती प्रत्यक्ष काम करत असताना तांत्रिक अडचणी उद्भवत आहेत. कारण यावेळीची जनगणना डिजिटल स्वरूपात असल्याने तांत्रिक अडचणी निर्माण होत आहेत. त्या अडचणी सोडवण्यासाठी लोहारा तहसील अंतर्गत तांत्रिक सहकार्य करण्यासाठी सहा तज्ञ मार्गदर्शकाची टीम तयार करण्यात आली आहे. ते प्रगणक आणि पर्यवेक्षक यांना ऑनलाईन, ऑफलाइन सहकार्य करत आहेत. त्यामुळे कामकाजाची गती वाढण्यास मदत होत आहे. २ दिवसात ८० टक्के काम होणार जनगणना २०२७ चा पहिला टप्पा १६ मे पासून सुरू झाला. घरोघरी जाऊन गणना करण्यात येत असून आज अखेर जवळपास ६० टक्के कामकाज पूर्ण झाले आहे. तालुक्यातील सहा प्रगणकाचे काम १०० टक्के पूर्ण झाले आहे. सर्व माहिती पर्यवेक्षक तपासून पूर्ण करत आहेत. पुढील दोन दिवसांमध्ये ८० टक्के कामकाज पूर्ण होईल अशी शक्यता आहे.

डाटा एन्ट्री कक्षाला दिली भेट प्रकाश यांनी संगणक यंत्रणेच्या प्रतिनिधींनी संगणकीय प्रणाली आणि प्लिकेशनच्या माध्यमातून डेटा कसा फीड केला जात आहे, याचे प्रात्यक्षिक दाखवले. चेतन प्रकाश यांनी संगणक कक्षाला भेट देऊन डेटा एन्ट्री आणि ऑनलाइन प्रणालीच्या कामकाजाची बारकाईने पाहणी केली व तांत्रिक अडचणी सोडवण्याच्या सूचना दिल्या.

काम पारदर्शकपणे पार पाडावे जनगणना हे देशहिताचे आणि भविष्यातील नियोजनाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे काम आहे. पहिल्या टप्प्यातील काम अचूक आणि वेळेत पूर्ण होणे गरजेचे आहे. लोहारा तालुक्यातील संपूर्ण यंत्रणेने तांत्रिक बाबींचा योग्य वापर करून हे काम अत्यंत पारदर्शकपणे पार पाडावे. दोन दिवसात कामात चांगली प्रगती दिसेल. चेतन प्रकाश, जिल्हा जनगणना समन्वयक, धाराशिव.

# 'जागर महाराष्ट्राचा' उपक्रमातून अमृत योजनेची जनजागृत



भूम (प्रतिनिधी)- महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास मंत्रालयाच्या वतीने तसेच भूम नगर परिषदेच्या सहकार्याने 'जागर महाराष्ट्राचा' उपक्रमांतर्गत शहरात अमृत २.० योजनेची लोककलेच्या माध्यमातून व्यापक जनजागृती करण्यात आली. शहरातील विविध चौकांमध्ये आयोजित कार्यक्रमांमधून नागरिकांना योजनेचे महत्त्व पटवून देण्यात आले.

या अभियानाचे उद्घाटन नगराध्यक्षा संयोगिता गाढवे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी नगरसेविका रिमा शिंदे व भाग्यश्री माने यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमादरम्यान अमृत २.० योजनेअंतर्गत शहरातील पाणीपुरवठा व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी शासनाकडून करण्यात येत असलेल्या प्रयत्नांची माहिती नागरिकांना देण्यात आली.

शहरातील विविध भागांत झालेल्या या कार्यक्रमांना नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. लोककलेच्या माध्यमातून शासनाच्या योजना अधिक प्रभावीपणे जनतेपर्यंत पोहोचतात, अशी भावना उपस्थित नागरिकांनी व्यक्त केली.

यावेळी नगरसेवक तौफिक कुरेशी, रिमा शिंदे, भाग्यश्री माने,मुशीर शेख, आक्तर जमादार, सुनील शेटे, रवींद्र भोसले, प्रकाश गाढवे, तुकाराम माळी, कुणाल गायकवाड, प्रवीण गाडे, आजिनाथ गिते, सुमित जाधव, सुदर्शन उंदरे, विशाल शिंदे, ऋषिकेश तट, धीरज कांबळे यांच्यासह नगर परिषदेचे अधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

विद्यापीठातील विद्यार्थ्यांचा सहभाग मुक्ताई कला मंच तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या नाट्यशास्त्र विभागातील आजी-माजी विद्यार्थी, प्रा. रुपेश ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखालील कलावंतांनी लोकनाट्य, गीत व प्रबोधनात्मक सादरीकरणातून अमृत २.० योजनेचे फायदे प्रभावीपणे मांडले. घराघरापर्यंत शुद्ध पाणी पोहोचविणे, पाणीपुरवठा व्यवस्थेचे सक्षमीकरण, जलसंधारण आणि नागरिकांच्या आरोग्यदायी जीवनासाठी या योजनेचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले.

# प्राण्यांना निर्दयपणे वागणुक देवून वाहतुक करणाऱ्यावर गुन्हा दाखल

धाराशिव (प्रतिनिधी)- परंडा पोलीस ठाणे अंतर्गत पोलिसाकडून समजलेली माहिती अशीह की, इम्रान गणी कुरेशी, बब्बु कुरेशी, अमजद कुरेशी सर्व रा. परंडा ता. परंडा जि. धाराशिव यांनी दि. २५.०५.२०२६ रोजी २३.०० वा. सु. कुरेशी गल्ली परंडा येथे गोवंशीय जातीच्या २ जर्शी गायी व २ गावरान गायी एकुण ४०,००० किंमतीच्या जनावरांची चारा पाण्याची व्यवस्था न करता निर्दयतेने कत्तलीसाठी बेकायदेशीर रित्या बांधुन ठेवल्या असताना परंडा पोलीसांना मिळून आले. यावरुन पोलीसांनी सरकारतर्फे नमूद व्यक्तींविरुध्द प्राण्यास क्रुरतेने वागण्यास प्रतिबंध अधिनियम कलम ११(१),११(१)(ए),११(१)(एफ),११(१) (एच), ११(१)(आय) सह कलम २(अ), ५(बी), ९(ब), ११ महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

# अणदूरचा निकृष्ट उड्डाणपूल अखेर पाडला: बारा वर्षांनंतरही काम अपूर्णच; कोट्यवधींची टोल वसुली मात्र सुरु

**सोलापूर/प्रतिनिधी** सोलापूर ते हैदराबाद या राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६५ वरील अणदूर येथील जवाहर महाविद्यालयासमोर उभारण्यात आलेला उड्डाणपूल अखेर प्रशासनाला पाडावा लागला आहे. या पुलाचे बांधकाम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाले होते. एखादे अवजड वाहन गेल्यास हा पूल झुलत्या मनोऱ्यासारखा हलत असल्याचे अनेकदा समोर आले होते. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले. अखेर पुलाच्या तटभिंतीला मोठ्या भेगा पडल्या आणि सुरक्षा कठड्याच्या सिमेंट प्लेट्स बाहेरच्या बाजूला झुकल्या. यानंतर मात्र संबंधित यंत्रणेला जाग आली आणि कोणताही मोठा अपघात होण्यापूर्वी, गेल्या आठ दिवसांपासून अहोरात्र यंत्रसामग्री राबवून हा पूल पाडण्यात आला. सध्या या भागातील वाहतूक सर्व्हिस रोडवरून वळवण्यात आली असून, आता या पुलाचे बांधकाम कधी पूर्ण होऊन वाहतूक पूर्ववत होणार, याकडे प्रवाशांचे डोळे लागले आहेत.या उड्डाणपुलाच्या पूर्व आणि पश्चिम अशा दोन्ही बाजूंना खडक, माती व दगडांचा भराव करून डांबरीकरण करण्यात आले होते. त्यानंतर हैदराबादकडून सोलापूरकडे जाणारी एकतर्फी वाहतूक या पुलावरून सुरू करण्यात आली. मात्र, महिना-दोन महिने पूर्ण होत नाहीत तोच हा रस्ता बंद करावा लागला. जाणकार सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, उड्डाणपुलाच्या दोन्ही बाजूंना सिमेंट काँक्रीटचे पॅनल्स बसवताना 'रबर पॅकिंग मटेरियल'चा वापरच करण्यात आला नव्हता. तसेच भरावाची योग्य दाबादाब (रोलिंग) न झाल्यामुळे आतमध्ये पोकळी निर्माण झाली होती.

यामुळे अखेर पूर्वेकडील (नळदुर्ग बाजूकडील) पूल आणि रस्ता पूर्णपणे खोदून काढण्याची नामुष्की राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे अधिकारी आणि कंत्राटदारावर आली आहे. अनेकांचे गेले बळी; आंदोलने दडपण्याचा सातत्याने प्रयत्न या अर्धवट आणि धोकादायक कामामुळे गेल्या १० वर्षांत जवळपास १०० हून अधिक निष्पाप नागरिकांना आपला जीव गमवावा लागला आहे, तर अनेकजण कायमचे अपंग झाले आहेत. महामार्ग प्राधिकरण, जिल्हा प्रशासन आणि लोकप्रतिनिधी यावर केवळ बघ्याची भूमिका घेत असल्याने वैतागलेल्या ग्रामस्थांनी अनेकदा तीव्र आंदोलने करत टोल नाका बंद पाडला होता. मात्र, दरवेळी प्रशासनाने केवळ तोंडी आश्वासने दिली.

टोल वसुलीसुरू आहे जोरात, सुविधा मात्र पुरवल्याच नाहीत टोल वसुली जोरात, सुविधा मात्र शून्य: एकीकडे महामार्गाचे काम अर्धवट आणि निकृष्ट दर्जाचे असताना, दुसरीकडे मात्र वाहनधारकांकडून टोलची वसुली जोरात सुरू आहे. २०१९ पासून एका खासगी कंपनीने येथील टोल नाक्यावर वसुली सुरू केली असून ती आजतागायत अविरत सुरू आहे. या महामार्गावरून दररोज जवळपास ८० हजार वाहने धावतात, ज्यातून दैनंदिन ५ ते ८ लाख रुपयांचा टोल वसूल केला जातो. गेल्या आठ वर्षांत कोट्यवधी रुपयांचा टोल वसूल होऊनही प्रवाशांना दर्जेदार रस्ता का मिळत नाही? असा संतप्त सवाल नागरिकांमधून विचारला जात आहे. अधिकाऱ्यांची बोलती बंद : अणदूर येथील या निकृष्ट कामाबाबत आणि पूल पाडण्यामागच्या कारणांबाबत राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे कार्यकारी अभियंता स्वप्नील कासार यांच्याशी भ्रमणध्वनीवरून (मोबाईल) अनेकदा संपर्क साधण्याचा प्रयत्न केला, मात्र त्यांनी फोन न घेतल्यामुळे संपर्क होऊ शकला नाही. १२ वर्षांचा इतिहास; तरीही काम अर्धवटच! या राष्ट्रीय महामार्गाचा सर्व्हे झाल्यानंतर रस्त्याचे टेंडर काढण्यात आले होते. त्यानंतर २०१४ मध्ये संबंधित कंत्राटदार कंपनीने महामार्गाच्या कामाला सुरुवात केली.

आज या गोष्टीला तब्बल १२ वर्षे पूर्ण झाली, तरीही या महामार्गाचे अणदूर येथील काम अद्याप सुरूच आहे. या निकृष्ट आणि थातूरमातूर कामाविरोधात स्थानिक नागरिकांनी आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी अनेकदा आंदोलने केली.प्रशासकीय यंत्रणेने केवळ आश्वासनेच दिली.

# तुळजापुरात लाखावर भाविक,चार तासांनंतर होते तुळजाई मातेचे दर्शन

धाराशिव/प्रतिनिधी चार-चार तास रांगेत थांबून ही तुळजाभवानी मातेचे दर्शन होत नसल्याने धर्म दर्शन रांगेतील संतप्त भाविकांचे मंदिरचा सुरक्षा रक्षकासोबत खटके उडत आहेत. प्रचंड गर्दीत ही मंदिर संस्थानचा जबाबदार अधिकाऱ्यांचा दुर्लक्षामुळे मंदिरातील नियोजन बिघडले आहे. दरम्यान अधिक मासातील मंगळवारचा योग साधत मंगळवारी लाखावर भाविकांनी तुळजाभवानी चरणी माथा टेकला. भाविकांचा प्रचंड गर्दी मुळे मंदिर संस्थानचे नियोजन बिघडले असून, मंदिर संस्थानचे वरिष्ठ अधिकारी दुर्लक्ष करत असल्याने भाविकांतून संताप व्यक्त करण्यात येत आहे.

उन्हाळी सुट्ट्यां तसेच अधिक मांसातील मंगळवारचा योग साधत लाखावर भाविकांनी तुळजाई नगरीत हजेरी लावली. पहाटेपासून दर्शन मंडपाचे सर्व मजले भरून दर्शन रांगा बाहेर आल्या होत्या, सशुल्क दर्शन रांगेचे सर्व प्रांगण भरले होते. ५०० रुपयाची स्पेशल दर्शन रांग पुलापर्यंत आली होती. मंगळवारी दिवसभर धर्मदर्शनाला चार ते साडेचार तास तर सशुल्क दर्शनाला दोन ते तीन तास वेळ लागत होता. ५०० रुपयांच्या स्पेशल दर्शनाला अर्धा ते एक तास वेळ लागत होता. तत्पूर्वी पहाटे चरणतीर्थ पूजेनंतर मंदिर भाविकांसाठी खुले करण्यात आले. सकाळी सहा वाजता अभिषेक पूजेला प्रारंभ करण्यात आला. तर सायंकाळच्या अभिषेक पूजेनंतर रात्री उशिरा मंगळवारनिमित्त संभळाचा कडकडाटात छबिना मिरवणूक काढण्यात आली. तुळजापुरात सध्या सुरू असलेल्या भाविकांच्या प्रचंड गर्दीच्या पार्श्वभूमीवर मंदिर प्रशासनासमोर नियोजनाचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. पुढील काही दिवस ही गर्दी अशीच कायम राहण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे दर्शन व्यवस्थेत सुधारणा करणे, रांगेचे विभाजन अधिक प्रभावी करणे आणि सुरक्षा वाढवणे गरजेचे असल्याचे मत तज्ज्ञांकडून व्यक्त होत आहे. तसेच भाविकांच्या मूलभूत सुविधा, पाणी, निवारा आणि स्वच्छता यावरही विशेष लक्ष देण्याची मागणी होत आहे.

चार-साडेचार तास रांगेत तरी देव दिसत नाही मंगळवारी भाविकांना धर्म दर्शनाला ०४ ते साडेचार तास रांगेत थांबावे लागत होते. मात्र त्या नंतर हि सिंह गाभाऱ्यातून सुरक्षा रक्षक बाहेर ढकलत असल्याने भाविकांतून संताप व्यक्त करण्यात येत होता. ०४ ते साडेचार तास रांगेत थांबूनही तुळजाभवानी मातेचे दर्शन होत नसल्याने ढकला-ढकली करणाऱ्या सुरक्षा रक्षकासोबत भाविकांचे खटके उडत होते. खाजगी सुरक्षा रक्षकांची मुजोरी थांबवण्याची मागणी होत आहे.

सशुल्क दर्शनचा दिमतीला अधिकारी कर्मचारी : ५०० रुपयांचा स्पेशल दर्शन पाससह सशुल्क दर्शन पासचा माध्यमातून मंदिर संस्थानला मोठ्या प्रमाणावर महसूल मिळत असल्याने केवळ सशुल्क दर्शन रांगेतच मंदिर संस्थानने अधिकारी- कर्मचाऱ्यांना तैनात केले आहे. त्याच वेळी धर्म दर्शन तसेच मुख दर्शन रांगेची मदार कंत्राटी सुरक्षा रक्षकांवर सोपवण्यात आल्याने सामान्य भाविकांना तुळजाभवानी मातेचा दर्शनासाठी त्रास सहन करावा लागत आहे.

# कांदा उत्पादक शेतकरी आर्थिक संकटात!



**धाराशिव (रामेश्वर डोंगरे)-** राज्यातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांची परिस्थिती दिवसेंदिवस बिकट होत चालली असून बाजारात कांद्याला अवघा ५ ते ६ रुपये किलो दर मिळत असल्याने शेतकरी अक्षरशः हवालदिल झाला आहे. एकीकडे शासनाकडून १२ रुपये दराने कांदा खरेदी करण्याची घोषणा करण्यात आली, मात्र प्रत्यक्षात शेतकऱ्यांच्या पदरात काहीच पडत नसल्याचा आरोप शेतकरी करत आहेत.

उन्हाचा प्रचंड तडाखा, त्यात अचानक आलेल्या वादळी पावसामुळे शेतात साठवलेला कांदा सडू लागला आहे. लाखो रुपये खर्च करून पिकवलेला कांदा आता कवडीमोल भावात विकण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली आहे. उत्पादन खर्च, वाहतूक, मजुरी आणि बाजार समितीचे खर्च वजा करता शेतकऱ्यांच्या हातात काहीच राहत नसल्याने अनेक शेतकरी कर्जाच्या विळख्यात अडकले आहेत. शासनाकडून मोठमोठ्या घोषणा केल्या जात असल्या तरी प्रत्यक्षात शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळण्याचे काम सुरू असल्याची संतप्त प्रतिक्रिया ग्रामीण भागातून उमटत आहे.

कांद्याच्या हमीभावासाठी आणि तात्काळ आर्थिक मदतीसाठी शेतकरी संघटनांनी सरकारला इशारा दिला आहे. आश्वासनं मिळतात, पण बाजारात भाव मिळत नाही मग शेतकरी जगायचं कसं? असा संतप्त सवाल आता शेतकरी विचारत आहेत. कांदा उत्पादकांच्या डोळ्यातील अश्रू पुसण्यासाठी शासनाने तातडीने ठोस निर्णय घ्यावेत, अन्यथा राज्यभर तीव्र आंदोलन उभे राहण्याची शक्यता व्यक्त होत आहे.


# लातूर समाचार धाराशिव
## बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क
9422472502
9175325708
9284321472


# धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२९४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४०
२४) २४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५) २२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२-२२४१८४

सांज दैनिक लातूर समाचार हे मुद्रक,प्रकाशक ,संपादक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर येथे छापून समर्थनगर धाराशिव येथे प्रकाशित केले आहे.

Evening Daily Latur Samachar is Published by Dayanand Shankar Jade from Samarth Nagar,Dharashiv on behalf of Dayanand Shankar Jade ,edited by Dayanand Shankar Jade and Printed by Dayanand Shankar Jade at Jade Offset Printers,Mitra Nagar,Latur. Editor : Dayanand Shankar Jade Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649